एप्र
६६
३ २६५
ई/१५८

HISTORY OF DHAR STATE

(Modern period)

1

SERVICES OF THE PUARS,

ESPECIALLY OF DHAR,

IN THE MARATHA EMPIRE.

धार संस्थानचा इतिहास

(अर्वाचीन काळ)

१

मराठी साम्राज्यांत पवारांची

विशेषतः

धारच्या पवारांची कामगिरी.

लेखक :— का. कृ. लेले व शि. का. ओक.

(सन १९२६ ईसवी)

धार संस्थानचा इतिहास

(अर्वाचीन काल)

१

मराठी साम्राज्यांत पवारांची

विशेषत:

धारच्या पवारांची कामगिरी

लेखक

काशिनाथ कृष्ण लेले व शिवराम काशीनाथ ओक.

(दरबारच्या परवानगीनें छापून प्रसिद्ध केलें.)

इतिहास कचेरी संस्थान धार

सन १९२६ ईसवी.

मुद्रकः– विष्णु काशीनाथ खरे, म्यानेजर आनंदसागर स्टीम प्रेस,
संस्थान धार.

प्रस्तुत पुस्तकांत ज्या ग्रंथांचे व अप्रकाशित लेखांचे व कागद पत्रांचे आधार दिले आहेत, त्यांतील प्रमुखांची यादी येणें प्रमाणें :–

आधारभूत ग्रंथ

1. Report of Malwa and adjoining countries by Sir Jhon Malcolm [1821].
2. An Historical sketch of the Native States of India by Col. G. B. Malleson.
3. History of the Marathas by James Grant Duff Vols. I. & II.
4. A memoir of Central India Vols. I and II by Sir J. Malcolm.
5. Later Mughals Vol. I and II by W. Irvine.
6. Rise of the Maratha Power by M. G. Ranade.
7. Selection from the Satara Rajas' and Peshwas' Diaries by R. B. Vad and Parasnis.

   (१) छत्रपती शाहू महाराज यांची रोजनिशी.

   (२) बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी.

   (३) सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी.
8. Rulars of Baroda by Eliot.
9. Gazetteers :—

   [1] Dhar State.

   [2] Dewas State.

   [3] Bijonor.

१०. मराठी रियासत मध्यविभाग १, २, ३, ४ (गो. स. सरदेसाई कृत).

११. परमार घराण्याचा इतिहास (देवासकर फडके कृत).

१२. मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष (रानडे कृत ग्रंथाचे भाषांतर).

१३. शिवाजी महाराजांचें चरित्र (केळुसकर कृत).

१४. शिवाजी महाराजांची बखर (विविधज्ञान विस्तार १८८१ इ.).

१५. मुलांचा महाराष्ट्र (गो. अ. मोडक कृत).

१६. दक्षिणेंतील सरदारांच्या कैफियती व यादी (पारसनीस व मावजी).

१७. मराठ्यांच्या इतिहासाची साधनें (राजवाडे) खंड १, २ (पेशव्यांची शकावली), ३, ६, ८, ११, १५.

१८. गुजराथचा इतिहास (लोकहितवादी कृत).

१९. ब्रह्मेंद्र स्वामींचें चरित्र (पारसनीस कृत).

२० इचलकरंजीकरांचा इतिहास (खरे शास्त्री कृत).

२१. थोरले शाहू महाराजांचें चरित्र (काव्येतिहाससंग्रहा पैकीं).

२२. होळकराची कैफियत (का. सं. पैकी).

२३. पत्रें, यादी वगैरे (काव्ये. सं. पैकी).

२४. तह, करार, मदार (मावजी व पारसनीस).

२५. भारत इतिहास मंडळाचे तृतीय संमेलन वृत.

२६. भाऊसाहेबांची बखर (काव्ये. सं. पैकी).

२७. ऐतिहासिक लेख संग्रह भाग १ व २ (खरे शास्त्री).

२८. इतिहास संग्रह (पारसनीस, पुस्तके १ ते ८).

(१) महेश्वर दरबारचीं बातमी पत्रें.

(२) अलीबहादराचा पत्र व्यवहार.

(३) पेशवे दफ्तरांतील कागदपत्रें व माहिती.

२९. होळकरशाहीच्या इतिहासाची साधनें खंड १ ला (अ. ना. भागवत).

३०. पेशव्यांची बखर सोहनी कृत.

३१. देवी अहल्या चरित्र (पुरुषोत्तम कृत).

३२. मध्यहिंदुस्थानचा इतिहास (वि. ज. कीर्तने).

अप्रकाशित लेख व कागद पत्रें.

१. धार दरबार दफ्तर (हुजूर जामदारखाना व पॅलेस रेकॉर्डस्).

२. मलठण संस्थान दफ्तर.

३. जमीदार धरमपुरी दफ्तरांतील महजर.

४. विस्तारनामा.

५. शिक्केनवीस दफ्तर (यादी नं० १ व २ व इतर कागद)

६. लेले दफ्तर.

७. कवठेकर राजोपाध्ये दफ्तर.

८. श्रीभागीरथी सोरमघाट तीर्थोपाध्याया कडील लेख.

९. महालझाडा हिंदुस्थान (सन तिसा सितेन साला बद्दल) खांडेकर संग्रहापैकीं.

१०. लडावदकर पवारांचे दफ्तर.

११. खांडेकर दफ्तर व संग्रह (उज्जैन येथील).

१२. फणसे दफ्तर (बडोदें येथील).

१३. धार येथील मुकुंद जोशी यांजकडील जन्म टिपणें.

१४. पारसनीस संग्रहांतील एक पत्र (सातारा येथील).

१५. इंदूरकर मंडलोई (जमीनदार) यांजकडील कागद पत्रें.

संस्करण

पृष्ठ.	ओळ.	मूळ.	संस्करण
७	१४	प्रमुखत्वान	प्रमुखत्वानें
९	१२	ती	होती
११	२४	अस्वेरीस	अखेरीस
१३	१०	दक्षिणेंत निघून गेले	निघून गेले
१३	१२	यांजवर जारीझालेली	यांस पाठविलेली
१५	१४	डभोई	डभोई
१७	१२	मोव्या	मोव्या
२१	६	यांजवर जारीकेलेली	यांस पाठविलेली
२१	२०	यांजवर जारीझालेली	यांस पाठविलेली
२३	७	उदाजीरावांचे दुसरे	आनंदरावांचे धाकटे
३१	४	मुंळ	मुळें
३९	१६	विरुद्ध	वाकडें
४४	१२	विरुद्ध	विरुद्ध
४५	२।३	व शिवाजी विठ्ठल यांज बराबर	यांचे लष्करांत दुसऱ्या सरदारांच्या फौजां बराबर ग्वाल्हेर प्रांतीं
४८	१९	आनंराव	आनंदराव
५०	१७	निदेश	निर्देश

पृ. १२ मधील उज्जन व सिरोंज येथील चकमकीचे प्रसंग पालखेडचे मोहिमेचे पूर्वी पाहिजेत.

पृ. ३६ ओळी २३ व २४ मधील कस चुकून पडला आहे.

या शिवाय कांहीं ठिकाणीं काना मात्रा वेलांट्या अनुस्वार व क्वचित ठिकाणीं छापतानां अक्षरें उडालीं आहेत तीं वाचकांनी संदर्भानें लावून घ्यावीत.



Lt. Col. His Highness Maharaja Sir Udaji Rao Puar Saheb Bahadur, K. C. S. I., K. C. V. O., K B. E. of DHAR.

श्री

प्रस्तावना

इतिहासप्रदीपेन मोहावरणघातिना ।
लोकगर्भगृहं कृत्स्नं यथावत्संप्रकाशितम् ॥

— महाभारत आदि० अध्याय १ श्लो० ८७ —

प्रपंच आणि परमार्थ या मानवी जीविताच्या दोन्ही प्रांतांत इतिहासासारखा महत्वाचा दुसरा मार्गदर्शक प्रायः सांपडावयाचा नाहीं. दोन्हींत मागील विचार केल्याशिवाय पुढें पाऊल टाकतां येणें कठीण. भरतखंडांत प्राचीन ऋषिमुनींनीं अनेक विषयांचा ऊहापोह करून जें अद्भुत वाङ्मय निर्माण केलें आहे, तें पाहून परद्वीपस्थ लोक आश्चर्यचकित होतात ; असें असून त्या वाङ्मयांत इतिहासाची उणीव का असावी हें समजत नाहीं. अलीकडे शें सवाशें वर्षांत इतिहासभक्त इंग्लिश राष्ट्राशीं आपला निकट संबंध दैवयोगें जुळून आला, तेव्हां पासून ती उणीव घालविण्याविषयीं प्रथम त्यांजकडून व नंतर आपल्याकडील विद्वानांकडूनहि प्रयत्न चालू झाले.

भरतखंडाचे इतिहासांत माळव्याचा इतिहास फार महत्वाचा आहे, कारण मालवदेश हा भारतवर्षाचे केन्द्रस्थानीं असल्यामुळें भोंवतालच्या सर्व देशाशीं त्याचा थोडाफार संबंध प्राचीन कालापासून आहे. माळव्याची मुख्य नगरी उज्जयिनी ही पुराणप्रसिद्ध आहे. येथेंच भगवान श्रीकृष्ण यांचा विद्याभ्यास सांदीपनि मुनीचे आश्रमांत झाला. या नगरीची गणना भरतखंडांतील सात पवित्र पुऱ्यांत केली जाते. ज्योतिर्विदांची प्रथम याम्योत्तररेषा याच नगरींतून गेली आहे. ख्रिस्तपूर्व अडीचशें वर्षांचे सुमारास मौर्य साम्राज्यांतील एका मोठ्या मंडलाची ती राजधानी होती; आणि सम्राट् चंद्रगुप्ताचा महाविख्यात दयाळू नातू अशोकवर्धन हा उज्जयिनी येथें मंडलेश्वर होता. मौर्य वंशातील शेवटला

दुर्बल राजा ब्रृहद्रथ याचा सेनापती पुष्प(ष्य)मित्र यानें ईसवी सनाचे दुसरें शतकांत नवीन सम्राड्वंश सुरू केला, त्याचा पराक्रमी पुत्र अग्निमित्र हा माळव्यांत मंडलेश्वर होऊन विदिशा उर्फ भेलसा येथें राज्य करीत होता. त्यानें मालवराजकन्यका मालविका परिणिली. * यासुमारास हिंदुस्थानांवर यवन, शक इत्यादि लोकांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या, त्यांत शकांनीं तर आपलें साम्राज्य उज्जयिनी येथें स्थापून दोन अडीचशें वर्षें सत्ता गाजविली. ती चौथ्या पांचव्या शतकांत मगधच्या गुप्त सम्राटांनीं पुष्कळ दुर्बल केली. या काळच्या ह्मणजे पांचव्या शतकांतील शिलालेखांत धारचें नांव आढळतें; पण वस्तुतः धारानगरी याहीपेक्षां फार प्राचीन आहे. ईसवी सनाचे दुसरे शतकांतील ग्रीक भूगोलवेत्ता टालेमी यानें आपले ग्रंथांत जेरोगिरि (धारागिरि) या नांवानें तिचा उल्लेख केला आहे. यापुढें सहाव्या शतकांत माळव्यांतील राजा यशोधर्मदेव यानें गुप्तसम्राट बालादित्याचे साहाय्यानें हूणांचा व शकांचा पूर्ण उच्छेद करून स्वतः "शकारि विक्रमादित्य" हें बिरुद धारण केलें व उज्जयिनी ही आपली राजधानी करून साम्राज्यसत्ता चालविली; आणि पूर्वापार चालत आलेल्या मालव संवतास आपल्या नांवानें अंकित केलें. या विक्रमादित्याचेच पदरच्या कालिदासादि नवरत्नांवरून त्या काळीं माळव्यास विद्यापीठत्व प्राप्त झालें होतें. विक्रमादित्याचे कालीं धारेची प्रमुख राज्यांत गणना होत असे. × पुढें सातव्या शतकांत कनोज येथें विख्यात हर्षवर्द्धन यानें साम्राज्यसत्ता स्थापिली; तींत माळवा

---

* या कथनकावर कालिदासानें मालविकाग्निमित्र नांवाचें नाटक रचिलें आहे.

× विक्रमादित्याचे दिग्विजयवृत्तांत धारचा उल्लेख आला आहे तो असाः—

उद्दामद्रविडद्रुमैकपरशुर्लाटाटवीपावको ।
वेल्लद्वंगभुजंगराजगरुडो गौडाब्धिकुंभोद्भवः ॥
गर्जद्गुर्जरराजसिंधुरहरिर्धारांधकारार्यमः ।
कांबोजांबुजचंद्रमा विजयते श्रीविक्रमार्कोनृपः ॥

अंतर्भूत झाला. तें साम्राज्य आठव्या शतकांत लयास गेल्यावर माळव्यांत परमार वंशानें आपली सत्ता प्रस्थापित केली. उज्जयिनी ही त्यांची राष्ट्रीय राजधानी असून धार ही त्यांची आवडती कुल राजधानी होती. त्यांचा धारेशीं सुमारे पांचशें वर्षें अतिनिकट प्रेमाचा संबंध चवदावे शतकाचे आरंभा पावेतों राहिला. या परमार वंश मालिकेंत विद्यानुरागी कविबंधु उदार भोजदेव हा पदकस्थानीं मानिला जातो. किंबहुना भोजदेव हा विक्रमादित्याची पुनरावृत्तीच होता. तो मालवचक्रवर्ती व धारेश्वर म्हणविला जात असे. ईसवी सन १०५५ पावेतों सुमारें पन्नास किंवा त्याहून थोडी अधिक वर्षें त्यानें राज्य केलें. परमार कुलाची सत्ता नष्ट झाल्यावर सुमारें ५०० वर्षें मुसलमानांचा अम्मल माळव्यांत होता. त्यांची राजधानी प्रथम धार नंतर मांडवगड व शेवटीं उज्जयिनी होती. या तिन्हीं ठिकाणीं मशिदी, मुकर्बे, महाल वगैरे त्यांची स्मारकें विद्यमान आहेत. त्या नंतर अठराव्या शतकाचे पूर्वार्धात मराठ्यांनीं आपली सत्ता प्रथम माळव्यांत कायम करून पुढें सर्व हिंदुस्थानभर पसरिली. या राष्ट्रोत्कर्षाच्या समयीं पवार, होळकर, शिंदे, विंचूरकर इत्यादि महाराष्ट्रीय घराणीं नांवलौकिकास चढली; त्यांत पवारांचे घराणें प्राचीन व अग्रगण्य आहे. या घराण्यांतील पुरुष आपणांस माळव्यांतील प्राचीन परमार राजांचे वंशज समजतात. त्यांनीं पांचशें वर्षांनंतर माळव्यांत परत येऊन आपली प्राचीन पैतृक कुलराजधानी धारानगरी पुनः मिळविली. हा खरोखरच अपूर्व दैवयोग होय! या संक्षिप्त सिंहावलोकनावरून माळव्याचा व तत्प्रधानअंगत्वामुळें धारचा इतिहासही किती महत्वाचा व व्यापक आहे हें लक्षांत येईल.

या धारच्या इतिहासाच्या महत्वाची जाणीव प्रथमतः श्रीमंत कैलासवासी आनंदराव महाराज यांस झाली, व तें काम सिद्धीस नेण्यालायक पंडिताचा ते शोध करीत होते. इतक्यांत प्रसिद्ध विद्वान वामनशास्त्री इस्लामपूरकर यांचें आगमन धार येथें झालें. त्यांनीं त्यावेळीं भोजराजाचा पिता नवसाहसांक अर्थात् सिंधुराजदेव

याचें पद्मगुप्त (परिमल) विरचित संस्कृत चरित्र मुंबई सरकारच्या आश्रयानें प्रसिद्ध केलें होतें. त्यांस त्या संबंधानें प्राचीन परमार घराण्याची माहिती मिळवावी लागली होती, तेव्हां पंडित वामनशास्त्री यांजकडेस हें इतिहासाचें काम सोंपवावें असा महाराजांनीं निश्चय केला. परंतु त्याच वेळीं पुष्कळ दिवस आजारी राहून शेवटीं तारीख १९ जुलई सन १८९८ ईसवी रोजीं महाराज कैलासवासी झाले, व त्यांचे सुपुत्र हल्लींचे महाराज श्रीमंत लेफ्टनन्ट कर्नल सर उदाजीराव पवार साहेब बहादुर के. सी. एस्. आय., के. सी. व्ही. ओ., के. बी. ई. हे राज्याधिकारी झाले. ते अल्पवयस्क असल्यामुळें ब्रिटिश सरकारतर्फे त्यांच्या राज्याची व्यवस्था चालविण्याकरितां राव बहादुर कृष्णराव वासुदेव मुळे बी. ए. यांची योजना झाली. त्यांनीं वरिष्ठ अधिकाऱ्यांचे संमतीने कै. महाराजांचा स्तुत्य हेतु सिद्धीस नेण्याकरीतां प. वामनशास्त्री यांचीच योजना केली. त्याप्रमाणें पं. वामनशास्त्री यांनीं पुष्कळ मेहेनत करून तीन विभागांत इतिहासाचा मसूदा मराठींत तयार केला. पहिले विभागांत प्राचीन परमार घराण्याचा इतिहास, दुसऱ्यांत मुसलमानी रियासतीचा इतिहास व तिसऱ्यांत महाराष्ट्रीय पवार घराण्याचा वृत्तान्त ग्रथित केला. रावबहादुर मुळे यांनीं तो मसूदा महाराष्ट्रांतील त्या वेळचे प्रसिद्ध विद्वान रावबहादुर महादेव गोविंद रानडे आणि डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांजकडेस तपासणी करितां पाठविला. त्यांत कित्येक ठिकाणीं निराधार विधानें केलेलीं आढळल्यामुळें उभयतां विद्वानांस तो पसंत पडला नाहीं. त्यांनीं त्याचे दुरुस्ती करितां कांहीं उपयुक्त सूचना केल्या होत्या. इतक्यांत राव बहादुर मुळे यांची बदली झाली व पंडित वामनशास्त्रीही स्वदेशीं गेले. यामुळें तें काम बारावर्षें मागें पडलें.

सन १९१४ ईसवी सालीं दिवाणबहादुर टी. छाजूराम आणि त्यांचे जागीं पुढें लवकरच नेमले गेलेले दिवाण रायसाहेब प्रमथनाथ बानर्जी यांनीं तें मागें पडलेलें काम पुनः हातीं घेऊन नवीन उपलब्ध

झालेले शिलालेख, ताम्रपट ऐतिहासिक लेख व जुनी कागदपत्रें यांचा नवीन पद्धतीनें विचार करून पुनः धारचा इतिहास तयार करविण्यांत यावा; अशी सल्ला श्रीमंत महाराज साहेब यांस दिल्यावरून तें काम मजकडेस सोपविण्यांत आलें. पं. वामनशास्त्री यांचा मसूदा समग्र मला उपलब्ध झाला नाहीं; परंतु त्यांतील जे भाग पाहण्यांत आले त्यांवरून असा निश्चय करावा लागला कीं, या इतिहासाची इमारत पुनः वेगळ्याच नवीन पद्धतीनें उभी केली पाहिजे. त्या निश्चयाप्रमाणें या कामासाठीं लागणारी साधनें जुळवून त्यांचे संशोधन करण्याचा उद्योग अनुकूलते प्रमाणें यथाशक्ति व यथामति आजपावेतों सतत चालविला आहे.

साधनें मिळवून त्यांचे काळजीपूर्वक संशोधन करणें व ती व्यवस्थित विभागून त्यावरून आवश्यक टिपणें तयार करणें हें काम मोठे मेहेनतीचें, जिकीरीचें व जबाबदारीचें आहे. तें माझ्यासारख्या एकट्या व वृद्ध मनुष्याचे हांतून तडीस जाणें कठीण जाणून श्रीमंत महाराज साहेब यांनीं पोक्त विचार करून दोन वर्षांपासून इतिहासभक्त राजश्री शिवराम काशीनाथ ओक यांस माझे मदतीस कृपाकरून दिलें. जमविलेली सामग्री व्यवस्थित विभागून त्यांत नवीन शोधाची भर घालण्याचा व टिपणें तयार करण्याचा उद्योग त्यांनीं पुढें चालविला आहे.

या इतिहासाचे तनि भागांपैकीं ई. स. ८०० ते १३१० पर्यंतचा प्राचीन इतिहासाचा पहिला भाग दरबारचे ग्याझेटियर तयार होत असतां मध्य हिंदुस्थानचे ग्याझेटिअरचे सुपरिन्टेन्डट मेहरबान ल्युअर्ड साहेब यांचे साहाय्यानें इंग्रजींत तयार करून संस्थानचे ग्याझेटियरांत परिशिष्टरूपानें ई. स. १९०८ सालीं प्रसिद्ध करण्यांत आला. तोच त्यांत कांहीं थोडी भर घालून संक्षिप्तरूपानें ई. स. १९१९ या वर्षीं धारेस मराठा शिक्षण परिषद झाली त्यावेळीं मराठींत रा. शिवराम काशीनाथ ओक यांजकडून तयार करवून छापून प्रसिद्ध केला. या भांगां-तील विषय अगदी नवीन व अत्यंत महत्वाचा असल्यानें अनेक ग्रंथ-कारांनीं व लेखकांनीं त्याचा उपयोग आपापल्या इंग्रजी, मराठी व हिंदी

ग्रंथांतून व लेखांतून केला आहे. पांच वर्षांपूर्वी जोधपूरचे साहित्याचार्य पंडित विश्वेश्वरनाथ रेऊ यांनीं आपल्या ' भारतीय राजवंश ' या हिंदी ग्रंथांत व नुकतेच इतिहासाचार्य चिंतामणराव विनायक वैद्य यांनीं आपल्या ' मध्ययुगीन ' भारत या मराठी व ' Mediaeval Hindu India ' या इंग्रजी ग्रंथांत त्यांतील पुष्कळ भागाचा समावेश केला आहे. अलीकडेही या परमारकालीन इतिहासाची आणखी बरीच नवीन माहिती मिळविली आहे. ती समाविष्ट करून तो भाग पुन: सुधारून लिहिला जावयाचा आहे. भोजदेवाचे वंशाचे पूर्वी शककर्ता विक्रमादित्य व कालिदास या प्रसिद्ध विभूती माळव्यांत चमकून गेल्या. त्यांच्या कालनिर्णयाची अत्यंत आवश्यकता वाटल्यावरून मध्यंतरी मोठ्या परिश्रमानें तो प्रयत्न करुन विविधज्ञानविस्तार, सरस्वती व माधुरी यां सारख्या विख्यात व बहुमान्य मराठी व हिंदी मासिक पुस्तकांचे द्वारें तो पंडित समाजापुढें मांडण्यांत आला. * तीन चार वर्षांत त्यावर खंडनपर लेख लिहिण्यांत आला नाहीं. यावरून त्यांत ठरविलेला त्यांचा सहावे शतकांतील काळच सर्वमान्य होईल असा भरंवसा वाटतो. हें काम ई. स. १९२० पासून तीन चार वर्षे चाललें होतें. त्यांतही रा. शिवराम काशीनाथ ओक यांनीं त्यांची इतिहास आफिसांत बदली होण्याचे पूर्वीही मनोभावें मदत केली.

दुसरा भाग मुसलमानी रियासतीचा. पं. वामनशास्त्री, मि. कॅम्बेल व कॅप्टन बार्नस् प्रभृतींनीं तयार करून ठेविला आहे. या भागासंबंधानेंही कांहीं नवीन माहिती मिळवून ठेवण्यांत आली आहे, पण याकामीं विद्वान् पर्शियन पंडिताची योजना होणें आवश्यक आहे.

---

* युरोपियन पंडितांचे नजरेस आणण्याकरितां या लेखाचें इंग्रजी भाषांतर तयार करविलें गेलें असून तें मि. एस्. एम्. एडवर्डस् सी. एस्. आय्., सी. व्ही. ओ. जॉइन्ट एडिटर यांनीं आपल्या इंडियन अॅन्टिक्वेरी मासिकांत छापविण्याचें कबूल केलें आहे.

या इतिहासाचा तिसरा भाग ह्मणजे मराठशाहीचा. तोही महत्वाचा व अधिक उपयुक्त आहे. त्यांत हल्लींच्या पवार राजघराण्याचें वृत्त यावयाचें आहे. या भागासाठीं आवश्यक असणारी सामग्री कामाचे सुरवातीपासून शक्यतेप्रमाणें जमविण्यांत आली; तथापि मदतगार मिळाल्यापासून या भागाचें संशोधन व संकलन शक्यतेप्रमाणें अधिक वेगानें चालविलें आहे. शक्यतेप्रमाणें ह्मणण्याचे कारण असें कीं, आपले लोकांत इतिहासाचे महत्वाची जाणीव कमी असल्यामुळें ऐतिहासिक माहिती फार कष्टानें उपलब्ध होते. ही सामग्री मिळविण्यासाठीं सुमारें दोनशेंवर ग्रंथ धुंडाळण्यांत आले असून धार, इंदूर, देवास, बडोदें, ग्वालेर, पुणें इत्यादि ठिकाणच्या निरनिराळ्या अनेक घराण्यांचे दप्तरांतून व संग्रहांतून सुमारें दोनहजारांवर कागदपत्रांच्या नकला मिळविण्यांत आल्या आहेत. त्यांवरून निरनिराळीं टिपणें करण्याचें काम चाललें आहे. हें काम फार चिकट आहे. त्यांत कित्येक नवीन प्रश्न उद्भवतात. त्यांचेही साधक बाधक प्रमाणांचा विचार करून निराकरण करून घ्यावें लागतें; यामुळें या कामांत कालाचा व्यय फार होतो. दुसरें इतिहासांत कालक्रमाचें फार महत्व असतें; कारण त्यावांचून प्रसंगांचा पूर्वापर संबध किंवा कार्यकारणभाव नीट कळत नाहीं; व निरनिराळ्या प्रसंगांचे काल निश्चित झाल्यावांचून त्यांचा क्रमही लाविता येत नाहीं. तेव्हां अशा कित्येक प्रसंगांचे कालनिर्णयाचीही खटपट करावी लागते. हें कालनिर्णयाचें काम किती जिकीरीचें व बारकाईचें असतें याची थोडीशी कल्पना शेवटीं परिशिष्टांत एके प्रसंगाचे कालनिर्णयाची चर्चा केली आहे तीवरून येईल. कालनिर्णयाप्रमाणेंच कित्येक वेळीं व्यक्ति व स्थल यांचाही निर्णय व निश्चय करावा लागतो.

सामान्य वाचकांस इतिहास लवकर वाचावयास मिळावा असें वाटतें, व अशा लोकांचे डोळे साहजीकपणेंच आज कित्येक दिवसापासून धारच्या इतिहासाकडे लागले आहेत; परंतु धारच्या एकंदर इतिहासाची व्याप्ति, त्याचे कक्षेंत येणारा मोठा कालविभाग व त्यास लागणारीं अनेक प्रकारचीं साधनें व तीं जमविण्यांत येणाऱ्या अनंत व अनिवार

अडचणी या सर्वांकडे लक्ष दिल्यास या कामीं उशीर कां लागतो हें लक्षांत येईल.

हल्लींच्या राजघराण्याच्या इतिहासाचे स्वाभाविकपणें दोन भाग पडतात. एक पेशवाईच्या अखेरी पावेतोंचा व दुसरा इंग्रजी अंमल सुरू झाल्या पासून आज पावेतोंचा. मागील दोन वर्षांत आजपर्यंत जमविलेल्या सामग्रीचें संशोधन करून पहिल्या भागाच्या इतिहासाचें विहंगम दृष्टया दिग्दर्शन करविण्यासाठीं दोन निबंध तयार केले त्यांतील पहिल्यांत मराठी साम्राज्यांत धारच्या पवार घराण्यांतील पुरुषांनीं काय काय कामागिऱ्या बजाविल्या हें साधार दाखविलें असून दुसऱ्यांत त्यांचें महत्व व दर्जा कोणत्या प्रकारचा होता हें दाखविलें आहे. हे दोन्ही निबंध ई. स. १९२४ व १९२५ या वर्षी पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या बाराव्या व तेराव्या संम्मेलन प्रसंगीं अनुक्रमें वाचण्यांत येऊन पसंत झाले. आणि मराठ्यांच्या इतिहासांत पारंगत व विद्वान लेखक रावबहादुर द. ब. पारसनीस, गो. स. सरदेसाई, प्रो. द. वा. पोतदार, द. वि. आपटे व पां. मा. चांदोरकर यांनीं ते वाचून त्यांविषयीं आपलें समाधान व्यक्त केलें व ते छापून प्रसिद्ध होण्याविषयीं इच्छा प्रदर्शित केली. ते प्रसिद्ध झाल्यापासून दुमराही एक महत्वाचा उपयोग आहे, तो हा कीं, हल्लीं महराष्ट्रांत सर्वत्र इतिहासाची चर्चा पुष्कळ वाढली असून या विषयाचा अभ्यास अनेक विद्वानांनीं सुरू केला आहे; तेव्हां अशा विद्वानांस ते बारकाईनें पाहण्यासाठीं मिळाल्यास त्यांकडून कांहीं आवश्यक व उपयुक्त सूचना किंवा नवी माहिती ही मिळण्याचा संभव आहे. ह्मणून ते निबंध छापविण्याविषयीं दरबारचे सेवेसी विनंती करण्यांत आली. ती दरबारांनीं मान्य करून छापविण्याची मंजूरी दिली. त्यांतील पहिला निबंध "**मराठी साम्राज्यांत पवारांची कामगिरी**" हा दरबारचे छापखान्यांत छापून तयार झाला, तो दरबारचे सेवेसी अत्यंत विनम्रभावानें सादर करण्यांत येत आहे.

पूर्वीं मालकम साहेबांनीं माळव्याचा बंदोबस्त करून त्या बद्दलचा आपला विस्तीर्ण रिपोर्ट कंपनी सरकारचे कारकीर्दींत नामदार मार्किस आफ हेस्टिंग्ज् यांचे सेवेशी ई. स. १८२१ सालीं सादर केला. त्या रिपोर्टांत त्यांनीं माळव्याचा इतिहास दिला आहे. त्यांत धार येथील पवार घराण्याचा वृतान्त अवघ्या दहा पृष्ठांत ग्रथित केला आहे. पुढें मॅलिसन साहेबांनीं ई. स. १८७५ या वर्षीं हिंदुस्थानांतील नेटीव्ह संस्थानाविषयींचा आपला ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांतही धार संस्थानच्या इतिहासास त्यांनीं जवळ जवळ इतकींच पृष्ठें दिलीं आहेत, व तो बहुतेक मालकम साहेबांचे आधारानेंच लिहिला आहे. एवढीच कायती पवारांच्या इतिहासाविषयींची संगतवार दिलेली आजपर्यंतची माहिती. तीच पुढें पंडित वामनशास्त्री यांनीं विद्वत्तेच्या व कल्पनेच्या जोरावर वाढवून लिहिली, व आपला धार येथील पवारशाहीचे इतिहासाचा भाग तयार केला. परंतु त्यांतील माहितीही अपूरी असून तींत कालविपर्ययाचे अनेक दोष घडले आहेत. मालकम साहेबांस जेवढी माहिती त्या गडबडीच्या काळांत मिळवितां आली तेवढी त्यांनीं ग्रथित केली. त्यांस पुष्कळशी तोंडी माहितीवर भिस्त ठेवावी लागल्यामुळें साहजीकच तींत सालांच्या व तारखामित्यांच्या चुका राहिल्या. तथापि त्यांनीं लिहिलेला वृत्तान्त मार्गदर्शक ह्मणन अत्यंत उपयोगाचा आहे, यांत कांहीं शंका नाहीं.

पुढें सन १९०८ ई० सालीं स्टेट ग्याझेटियर चें पुस्तक प्रसिद्ध झालें, परंतु त्यांतही मालकम साहेबांचे ग्रंथांतील चुकांची दुरुस्ती झाली नाहीं; व त्यापेक्षां अधिक माहिती घालण्यांत आली नाहीं. नाहीं ह्मटल्यास, मालकम साहेबांपासून अलीकडील ८०।८५ वर्षांतील इतिहास मात्र संक्षिप्त रीतीनें वामन शास्त्री यांचे खरड्यांत व ग्याझेटीयर मध्यें प्रविष्ट केला गेला आहे. हल्लीं मात्र आपणास सर्व माहीती तपासून, अन्य पुराव्यानें पडताळून, उपलब्ध साधनांच्या साहाय्यानें तींतील तारखामित्यांच्या दुरुस्त्या करून, अधिक मिळालेल्या माहितीची तींत भर घालून, साधार, सुसंगत व सविस्तर इतिहास लिहिला पाहिजे. आणि इतिहास खात्याकडून याच दिशेनें प्रयत्न चालला आहे.

प्रस्तुत निबंध दोन वर्षांपूर्वीं पुणें येथील भारत-इतिहास-संशोधक मंडळाचे बारावे संमेलनांत प्रथम वाचला गेला; × तथापि त्याचे त्या वेळच्या व आजच्या स्वरूपांत माहितीच्या दृष्टीनें दुपटी इतका फरक झाला आहे. अर्थात् त्यानंतर कागद पत्रांच्या संशोधनानें व ग्रंथांच्या अवलोकनानें त्यांत पुष्कळशा नवीन गोष्टींची भर टाकली गेली आहे.

पवार घराण्याची सर्व प्रकारची माहिती एकाच पुस्तकांत एकदम तयार करून वाचकांपुढें मांडतां आली असती तर बरें झालें असतें; हें खरें. परंतु हें वर दाखविलेल्या अडचणीमुळें इतक्यांत शक्य नाहीं, म्हणून ही त्या घराण्याची पहिल्या भागापुरती माहिती ह्या लहानशा पुस्तकांच्या द्वारें प्रथम सादर करण्यांत येत आहे. या दोन पुस्तकांत पवारघराण्यांतील पुरुषांच्या राजकीय हालचालीच्या तेवढ्या प्रसंगांचें नुसतें दिग्दर्शन केलें आहे. हे दोन निबंध पुढील संशोधन कार्यास मदत व्हावी व मुख्य ग्रंथलेखन सुलभ व्हावें या हेतूनेंच मुख्यत्वें लिहिले गेले आहेत; म्हणून त्यांच्या प्रतीही अगदीं बेताच्या काढविल्या जात आहेत. या घराण्यांतील पुरुषांचे कौटुंबिक संबंध व परिवार, स्वभाव, खासगी वर्तन आणि व्यवहार, राज्यविस्तार व कारभार, न्याय व जमाबंदी, वसूल वासलात वगैरे कामांची व लष्करी कामांची व्यवस्था, दिवाण व मुत्सद्दी व त्यांची घराणीं, राजपुरुषांचीं व स्त्रियांची धर्मकृत्यें, त्यांविषयींच्या इतर गोष्टी व आख्यायिका इत्यादि बहुविध प्रकारची माहिती शक्यते प्रमाणें मिळवून ठेविली आहे. ती पुढें तयार होणाऱ्या विस्तृत ग्रंथांत यथावकाश व यथासंभव दिली जाईल. प्रस्तुत पुस्तकांत केवळ पवारांच्या राजकीय हालचालीचे प्रसंग दर्शविले गेले आहेत, तथापि ते मालकम प्रभृतींच्या ग्रंथांतून आलेल्या अशा प्रसंगांहून पुष्कळच अधिक आहेत.

× या पुस्तकाचे परिशिष्टांत दिलेलें माळव्याचा सुभेदार गिरधर बहाद्दर याच्या मृत्यूविषयींचें टिपणही यंदाचें इतिहास-संशोधक-मंडळाचे चौदावे संमेलनांत विद्वत्समाजापुढें वाचण्यांत आलें.

त्यांची मोजदाद केली तर ते शें दीडशेंहून तरी अधिक भरतील. या शिवाय कांहीं तारखामित्यांच्या ही दुरुस्त्या केल्या गेल्या आहेत.

धारचा किंवा माळव्याचा प्राचीन इतिहास आज अनेक शतकांपासून अज्ञानांधकारांत व विस्मृतीच्या गर्तेंत पडून राहिला होता, त्याचा उद्धार संस्थानच्या ग्याझेटियरच्या निमित्तानें थोडासा झाला. त्यामुळें केवळ धारच्या व माळव्याच्याच नव्हें, तर भरतखंडाच्या प्राचीन इतिहासावरही कांहीं बाबतींत नवा प्रकाश पडला आहे. ही गोष्ट कित्येक विद्वानांनीं मान्य केली आहे. त्याच प्रमाणें हल्लीं जें महाराष्ट्रीय पवार घराण्याच्या इतिहासाचें संशोधन चाललें आहे त्यापासून विस्मृतीमुळें नजरे आड झालेलें पवार घराण्याचें महत्व, पराक्रम व वैभव यांची जाणीव वर्तमान व भावी इतिहासकारांस होईल ; इतकेंच नाहीं तर पर्यायानें महाराष्ट्राचे इतिहासावरही कांहीं अधिक प्रकाश पडेल. किंबहुना उत्तरहिंदुस्थानचे प्रथमांगण जो माळवा त्यांत मराठशाहीचा प्रवेश होण्याची गुंतागुंतीची हकीकत अधिक विशद होईल यागोष्टीचें सर्व श्रेय आमच्या विद्यानुरागी व इतिहासप्रिय महाराजांस मिळणार आहे. श्रीमंत महाराज साहेबांनीं या महत्वाचे कामीं आपला अखंड आश्रय चालू ठेविला आहे, ही गोष्ट त्यांस खरोखर भूषणास्पद असून त्या आश्रयाबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे.

या कामीं श्रीमंत महाराज साहेबांप्रमाणेंच त्यांचे दिवाण रावबहादुर सरदार खंडेराव गंगाधर नाडकर साहेब यांचीही सहानुभूति व मदत पूर्ण आहे. त्यांनां हल्लींच्या राजकीय जरूरीचे कामांतून सवड मिळणें शक्य नसतांही या विषयाचें महत्व जाणून त्यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून आरंभीं प्रस्तुत निबंध स्वतः ऐकण्याची तसदी घेतली व त्या संबंधानें समक्ष चर्चा करून कांहीं उपयुक्त सूचनाही केल्या, व पुढें तो छापून प्रसिद्ध करण्याची अनुज्ञा दिली. या बद्दल त्यांचे ही आभार मानणें अवश्य आहे.

दरबार प्रेसचे म्यानेजर रा. विष्णु काशीनाथ खरे यांनीं व त्यांचे हातांखालील मडळींनें हें प्रस्तुत पुस्तकाचें छापण्याचें काम अत्यंत काळजीपूर्वक व मेहनतीनें केलें, व इतिहास आफिसांतील कारकून नारायणराव आठले यांनीं सूची तयार केली; याबद्दल यासर्वांचे आभार व्यक्त करणें इष्ट आहे

शेवटीं आपल्या परमपूज्य पूर्वजांच्या इतिहासाच्या उद्धाराचें हें महत्वाचें काम आमच्या परमाप्रिय श्रीमंत महाराज साहेबांनीं चालविलें आहे, त्याबद्दल त्यांस पुन: अनेकवार धन्यवाद देऊन त्या **जगत्प्रभु श्रीगोपाळकृष्णापाशीं** आमच्या दयाळु महाराजांस लवकर आरोग्य देऊन चिरायु करावें अशी अत्यंत नम्र भावानें प्रार्थना करून ही लांबलेली प्रस्तावना संपवितों.

इतिहास आफीस धार,
मिती ज्येष्ट वद्य ६ गुरुवार
शके १८४८
ता० १ जुलै सन १९२६ ई०

काशिनाथ कृष्ण लेले.

प्रासंगिक निवेदन.

" इच्छावें एक आणि व्हावें भलतेंच " असाच एक प्रकार प्रस्तुत पुस्तकासंबंधानेंही झाला. आपले माजी परमप्रिय अधिपती कै. श्रीमत महाराज उदाजीराव पवार साहेब बहादुर यांचे ठायीं आपल्या कुलाचा व आपल्या महाप्रतापि पूर्वजांचा योग्य अभिमान वसत असल्या-मुळें महाराजांनीं आपल्या घराण्याच्या इतिहासाचा उद्धार व्हावा या साठीं आपले संस्थानांत इतिहास संशोधन वृक्षाचें बारा वर्षांपूर्वी बीजा-रोपण केलें व त्या पासून आलेल्या अंकुराची आपल्या नजरेखालीं मशा-गत ठेऊन त्यास वेळोवेळीं आवश्यक खत वगैरे घालून हळूहळू वाढवून वृक्ष रूपास आणिले, परंतु तो वृक्ष फळास येतो न येतो इतक्यांत महाराजांनी परलोकचा मार्ग स्वीकारला; ही घटना खरोखरच अत्यंत खेद जनक आहे. प्रस्तुतचें पुस्तक हें महाराजांनी लाविलेल्या त्या वृक्षाचें आरंभीचें अल्पफळ होय; तेव्हां तें प्रथमतः महाराजांसच अर्पण व्हावें, अशी आमची उत्कठ इच्छा असणें अगदीं साहाजिक होतें. परंतु काळाच्या विलक्षण गती मुळें तो आमचा इष्ट संकेत सफल होऊं शकला नाहीं; ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

वास्तवीक पाहतां या पुस्तकाचें बहुतेक काम महाराज साहेबांचे हयातींतच पूरें झालें असून तें व्यवस्थित स्वरूपानें त्यांजपुढें येण्याचे ऐन प्रसंगीं अगदीं अल्प वयांत ते आपलें अवतार कृत्य संपवून चालते व्हावे; हा केवळ दैवाचाच विचित्र खेळ ह्मटला पाहिजे. गेल्या जून महिन्यांत पुस्तक छापण्याचें काम संपत आलें त्या वेळीं महाराजांची स्वारी सोलन येथें आरोग्य प्राप्त्यर्थ हवा पालट करण्या साठीं गेली होती व तेथून महाराजांची प्रकृती सुधारत असल्याचे संदेश ही येत होते; तेव्हां महाराज यांस आरोग्य प्राप्त होऊन लवकरच ते धारेस येतील अशी आह्मांस फार आशा वाटत होती, परंतु दैवगतीमुळें पुनः त्यांची

प्रकृती बिघडून सोलन येथें ता० ३० जुलै सन १९२६ ई. शुक्रवार या दिवशीं महाराजांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग करून स्वर्गलोकीं प्रयाण केलें.

ज्या सेवकास आपली अल्प स्वल्पशी देखील सेवा स्वामिचरणीं अर्पण करण्याची सुसंधी मिळते ते खरोखरच सभाग्य होत, आणि ह्मणूनच प्रस्तुत प्रसंगीं आमच्या वाट्यांस असलें भाग्य आलें नाहीं, या बद्दल पुनः पुनः फार खेद वाटतो; परंतु ईश्वरी नेमानेमानें झाल्या गोष्टीस उपाय काय!

अशा परिस्थितींत तात्विक दृष्टीनें पाहिल्यास आतां एकच मार्ग दिसतो, तो हा कीं, यद्यपि श्रीमंत महाराज साहेब आपला स्थूल देह सोडून गेले तथापि ते कीर्ति रूपानें अमरच आहेत, तेव्हां त्यांच्या इहलोकींच्या अनेक स्मारकांपैकीं हें अल्प स्मारक ह्मणून ही अल्पशी कृती त्यांसच अर्पण करावी, ह्मणजे स्वर्गस्थ महाराजांचे यथार्थ पूजन केलेंसें होईल; आणि ह्मणून हाच तात्विक विचार लक्षांत घेऊन त्याच मार्गाचें अवलंबन आह्मीं येथें करीत आहों.

धार, मिती कार्तिक शु० १९
शुक्रवार शके १८४८, ता०
१९ नोव्हेंबर सन १९२६ ई.

काशिनाथ कृष्ण लेले.
शिवराम काशिनाथ ओक.

समर्पण

कै. ले. कर्नल श्रीमंत महाराज सर

उदाजीराव पवार साहेब बहादूर

के. सी. एस. आय., के. सी व्ही. ओ., के. बी. ई.,

संस्थान धार,

यांच्या अंगीं असणाऱ्या

स्वकुलाभिमान, जिज्ञासाबुद्धि व इतिहासप्रियता

इत्यादि गुणांचे निदर्शक

महाराजांच्या सदिच्छेनें व आश्रयानें तयार झालेलें

हें

महाराजांच्या महाप्रतापी पूर्वजांच्या पराक्रमाचें

संक्षिप्त वृत्त

स्मारक ह्मणून

स्वर्गस्थ महाराजांस

अत्यंत आदरबुद्धीनें व परमनम्रतापूर्वक

समर्पण केलें असे.

सेवक—का. कृ. लेले व शि. का. ओक.

॥ श्री ॥

मराठी साम्राज्यांत पवारांची

विशेषतः

धारच्या पवारांची कामगिरी.

(लेखकः काशीनाथ कृष्ण लेले व शिवराम काशीनाथ ओक, धार.)

मराठी साम्राज्याचा उदय होऊन दिवसें दिवस त्याचा विस्तार होण्यास आणि त्याचा दरारा व इभ्रत वाढण्यास महाराष्ट्रांतल्या ज्या घराण्यांतील पुरुषांचे पराक्रम कारण झाले आहेत, अशा घराण्यांत पवार घराण्याची गणना प्रमुखत्वानें केली पाहिजे. पवारांचें हें घराणें महाराष्ट्रांत फार पुरातन, अतिविस्तृत आणि अत्यंत विख्यात आहे. या घराण्यांतील पुरुषांनीं, स्वराज्य स्थापनेच्या उद्योगाच्या सुरवाती पासून पावणेदोनशें वर्षें कित्येक महत्वाच्या प्रसंगीं मोठमोठ्या कामगिऱ्या बजावून, मराठी साम्राज्याची अनुपम सेवा केली आहे. पावणेदोनशें वर्षां इतक्या दीर्घकाल पर्यंत, सतत स्वामिसेवेंत राहून, ज्या घराण्यांतील पुरुषांनीं साम्राज्याची इभ्रत वाढविण्यांत अत्यंत 'श्रम साहस' केले, व स्वराज्यासाठीं ज्या घराण्यांतिल अनेक पुरुषांनीं प्रसंगीं आपले प्राणही वेंचले अशाघराण्यांत हें घराणें प्रमुख किंबहुना अद्वितीय आहे असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं.

आज सुमारें ५० वर्षांपासून मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें मिळविण्याचे महाराष्ट्रांतील कित्येक विद्वानांचे प्रयत्न चालले आहेत.

परंतु पवार घराण्या सारख्या प्रसिद्ध घराण्यांतलि प्रत्येक पुरुषानें काय काय कामगिऱ्या बजाविल्या हें पूर्णपणें दाखविण्यास अद्याप असावीं तशीं साधनें उपलब्ध झालीं नाहींत. तथापि जीं कांहीं साधनें उपलब्ध आहेत त्यां वरून पवार घराण्यांतील विशेषतः धारकर पवारांचे घराण्यांतील पुरुषांनीं मराठी साम्राज्याचे घटक या नात्यानें, साम्राज्याच्या उदयकाला-पासून, बजाविलेल्या कामगिऱ्यांचें यानिबंधांत संक्षेपतः समालोचन करावयाचें आहे.

हें घराणें इसवी सनाच्या सत्राव्या शतकाचे प्रारंभीं सुपे पेठ्यांतलि कित्येक गावांत पाटिलक्या संपादून शहाजी राजे भोसले यांच्या जहागिरींत नांदत होतें (म. रि. मध्य. वि. पृ. २८४) छत्रपती शिवाजी महाराजांनीं स्वराज्यस्थापनेच्या उद्योगास आरंभ केला, त्यावेळीं या घराण्यांतलि प्रतापी पुरुष साबूसिंग ऊर्फ साबाजी किंवा शिवाजी पवार याची व छत्रपती शिवाजी महाराजांची एके प्रसंगीं भेट झाली व उभयतांही समानशील व समानव्यवसायी असल्यामुळें परस्परांचा स्नेह जडला व लागलींच महाराजांनीं साबाजी पवार यास आपले आश्रयास ठेवून घेतलें, तेव्हां पासून या घराण्याचे उदयास प्रारंभ झाला. शिवाजी महारांजांनीं ई० स० १६४६ त तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याचें तोरण बांधिलें त्या प्रसंगीं साबुसिंग उर्फ साबाजी पवार हा त्याचे आंगच्या पराक्रमामुळें अधिक प्रसिद्धीस आला. पुढें लवकरच कल्याणचा सुभा महाराजांनी हस्तगत केला त्या प्रसंगीं साबाजीनें चांगला पराक्रम करून साम्राज्याच्या वाढत्या कल्याणांत भर घातली. यावेळीं साबाजीनें आंबे गांवचे * घाटांत शत्रूस अगदीं जेर केलें. या लढाईत साबाजीचे हातास जखम लागली होती. (फडके परमार इतिहास.) साबाजी यानें नगर जिल्ह्यांत सुपें येथें आपलें ठाणें कायम करून त्या गांवास सुखेवाडी असें नांव दिलें होतें. पुढें ही वाडी खरोखरच सुखाची वाटिका बनली. साबाजी यास छत्रपतीचा

* आंबेगांव तालुके मावळांत कारल्याचे दक्षिणेस आहे.

आश्रय मिळून दिवसेंदिवस त्याचा उत्कर्ष होऊं लागला, हें मात्र सुप्या शेजारील हंगे गावचें दळवी यांना सहन झालें नाहीं. त्यांनीं साबाजी पवाराशी द्वेष करून झगडे करण्यास आरंभ केला. कित्येक वेळां उभयतांच्या झटापटी झाल्या, अखेरीस एकेदिवशीं हंगेकर दळवी यांनीं हंगें व सुपें यांचे दरम्यान जांभुळ ओढ्यांत रात्रीं छापा घालून साबाजीस ठार मारिलें. (फडके परमार इ.) या झटापटींत साबाजी पवार पडले त्या ठिकाणीं एक चौत्रा बांधलेला आहे, त्यावर लहानशी छत्री सर्व पवार मंडळींनीं बांधून आपल्या पूज्य मूळ पुरुषाचें स्मारक करणें योग्य आहे. *

मराठे लोकांत असलेल्या वतनाच्या अभिमानानें कित्येक वेळां फायदाही झाला आहे, तर कित्येक वेळां अशा अभिमानानें आपसांत तंटे उपास्थित होऊन तो अभिमान नाशासही कारण झाला आहे. या दुसऱ्या प्रकारचेंच हें एक उदाहरण आहे.

साबाजी मारला गेला त्यावेळीं त्यास कृष्णाजी या नांवाचा लहान वयाचा एक मुलगा होता. साबाजीचे मृत्यू नंतर त्याचे प्रतिस्पर्ध्यांकडून मुलास त्रास पोंचूं नये म्हणून साबाजीचे पदरच्या लोकांनीं त्याचे मातेसह त्यास आजोळीं संगमनेरास पोंचतें केलें. तेथें तो १६–१७ वर्षांचा झाल्यावर एके दिवशीं कांहीं प्रसंगानें आई कडून त्यास त्याचे पित्याचे मरणाची साग्र हकीगत कळली; तेव्हां त्यास फारच

* साबूसिंग पवारावर एक ऐतिहासिक कादंबरी नारायण सखाराम भाटे यांनीं लिहीली असून ती ई० सन १९१० सालीं बडोदें येथें त्या वेळीं निघत असलेल्या पुढारी पत्राच्या आश्रयदात्यांस भेट म्हणून वाटली होती. साबूसिंग पवाराचे नायकत्वावर हें कथानक रचिलें आहे. या वरून साबूसिंगाचे ऐतिहासिक महत्व ग्रंथ कर्त्याचें मनांत बरेंच बिंबलें होतें असें दिसतें.

वाईट वाटलें व ज्या हंगेकर सरदारानें आमच्या वडीलांचा घात करून आम्हांस असे दुःखाचे दिवस आणले त्याचा सूड उगविण्याचे इराद्यानें तो तेथून निघून छत्रपती शिवाजी महाराजां जवळ आला. महाराजांनीं त्याची हकीगत ऐकून व साबाजीचीं सेवा आठवून कृष्णाजी यास आपले आश्रयास ठेविलें; व कांहीं सरजाम देऊन सुखेवाडी म्हणजे सुपें येथें पाठविलें. कृष्णाजी यानें गावकऱ्यांस अनुकूल करून घेऊन तेथें आपलें ठाणें कायम केलें. यावेळीं ज्यानें कृष्णाजीचे बापास मारिलें होतें तो सरदार हयात नव्हता.

इ० स० १६५९ त अफझलखानाचा वध झाला त्यावेळीं व त्यानंतर, अफझलखानाचा मुलगा विजापुरकरांकडील शूर सरदार, फाजलखान याच्याशीं छत्रपतीच्या सैन्यांतील ज्या सरदारांच्या वेळोवेळीं झटापटी झाल्या त्या सरदारांत कृष्णाजी हा एक होता. असें सांगतात कीं, एके वेळीं फाझलखान यास मोरोपंत पिंगळे व कृष्णाजी पवार यांनीं वेढा घालून अडकाविलें होतें. मोरोपंत पिंगळें हा तर शिवाजीचा उजवा हात असून, (रानेड उत्कर्ष. पृ० ४७.) कृष्णाजी पवार हा त्याचा साहाय्यक होता. या हल्यांत या उभयतांस चांगलेंच यश मिळालें. या प्रसंगीं फाजलखानानें पंढरपूर येथील एका ब्राम्हण कन्येस जबरीनें पळवून नेलें होतें, तिला कृष्णाजीनें सोडविलें. × अशा प्रकारें कृष्णाजीनें छत्रपतीस साहाय्य करून शत्रूचा मोड केला. कृष्णाजीनें विजापूरकरांचे मुलुखांतील स्वाऱ्यांतही कामगिऱ्या बजाविल्या आहेत. बहुतकरून हा नेहमीं निजामशाहीचे सरहद्दीवर च असे. * (फडके पर. इ.)

× हा ऐतिहासिक प्रसंग ही अलीकडे एका नाटकांत गोंविला आहे.

* कृष्णाजी पवारावर ही साबूसिंगा प्रमाणें च एक स्वतंत्र कादंबरी लिहिण्याचा रा. भाटे यांचा विचार होता. यावरून त्यांजपाशीं या

कृष्णाजी पवाराचे हयातींतच त्याचे पुत्र छत्रपतीचे लष्करांत चाकरीस राहून कामगिऱ्या बजावीत होते. कृष्णाजी व त्याचे दोन पुत्र बुबाजी व केरोजी या त्रिवर्ग पितापुत्रांची त्यावेळीं छत्रपतीचे दरबारांतील नामांकित सरदारांत गणना होती. (शिवाजी महाराजांची बखर, विविधज्ञान विस्तार आगस्ट व सेप्टेंबर सन १८८१ ई. पृ. १९९) छत्रपती शिवाजी महाराजांच्या खास हुजूर पागेंतील सरदारांचे यादींतही यांचीं नावें आहेत. (केळुसकर शिवाजी चरित्र पृ. ५५४।५५५) या पवार सरदारां चे कामगिऱ्या बद्दल ' एकानेंही शिवाजी महाराजांशीं निमकहरामपणा केला नाहीं ' असें जस्टिस रानडे यांनीं म्हटलें आहे. (रानडे उत्कर्ष पृ. ३७) पवारांकडे सुप्या प्रमाणें वाघाळें येथील मोकद्दमी पुर्वी पासून होती व कृष्णाजीनें ई० स० १७९९ त आणखी मलठण

घराण्या संबधानें कांहीं अधिक ऐतिहासिक माहिती जमाविलेली असावी असें वाटतें.

हल्लीं तर ऐतिहासिक कादंबऱ्या व नाटकें पुष्कळच निघत आहेत, परंतु त्यांत कित्येक ठिकाणीं इतिहासाचा लोप किंवा अवास्तव विधानें केलेलीं आढळतात; यामुळें सामान्य जनतेच्या मनांत भलताच इतिहास बिंबविला जातो, इकडे अशा ग्रंथकारांनीं लक्ष देणें अवश्य आहे. ऐतिहासिक कथानकास अधिक रंग चढण्या करितां दुसरी भर घालतांना ऐतिहासिक व्यक्ती विषयीं आधारांवाचून अवास्तव विधानें करणें किंवा सत्याचा लोप अथवा अपलाप करणें कधीं ही युक्त होणार नाहीं. फार तर काय अशा ऐतिहासिक कादंबरी कर्त्यांनीं आपण केलेल्या विधानास ऐतिहासिक आधार ही टीपांतून दिले पाहिजेत; म्हणजे वाचकांची इतिहासा विषयीं अशी दिशाभूल होणार नाहीं. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांतून अशीच कांहीं विधानें आधारा वांचून साबूसिंग पवारा विषयीं केलेलीं आढळल्यावरून ही सूचना येथें देणें उचित व अवश्य वाटलें.

येथील निमे मोकदमी ही खरीद केली. (मलठणदफ्तर, महजर अप्रकाशित.) यावरून त्या काळीं मराठमंडळांत निरनिराळ्या ठिकाणीं पाटिलकीची वतनें करून ठेवण्याकडे कशी प्रवृत्ति होती हें लक्षांत येतें.

यावेळीं कृष्णाजीचे तिघे पुत्र बुबाजी, रायाजी व केरोजी हे अधिक वैभवास चढले होते.

छत्रपती राजाराम महाराजांचे वेळीं या त्रिवर्ग बंधूंनीं मराठी साम्राज्याचा विस्तार करण्याचे कामास सुरवात केली. "त्यांनीं मातबर जमयित बाळगून मुलुखांतील बंडें मोडिलीं व बंदोबस्त केला, आणि तापी तीरापयर्त स्वराज्याचा अम्मल बसविला." अशीं मोठमोठीं विश्वासाचीं कामें यांनीं बजाविलीं म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनीं बुबाजी यांस 'विश्वासराव' हें सन्मानाचें पद व सरंजाम दिला व केरोजी यास 'सेनाबारासहस्त्री' ही बहुमानाची पदवी दिली. (मुलांचा महाराष्ट्र पृ. ११० आ. २ री व मावजी कै. पृ. ६९–७९) केरोजी पवार यांचे शिक्क्यांत "श्री राजाराम चरणीं दृढभाव" असे शद्ब आहेत, यावरुन ते छत्रपती राजाराम महाराजांचे पदरीं वैभवास चढले ही गोष्ट स्पष्ट आहे. त्या काळच्या प्रमुख सरदारांत केरोजी पवार यांची गणना होत असून त्यांजकडे चाकण चौऱ्यायशी हा प्रांत वहिवाटीस होता. छत्रपति राजाराम महाराजां कडून मिळालेली 'विश्वासराव' ही पदवी ही ते आपणांस लावींत असत. (राजवाडे खंड १९ ले. ४४३) यावरून 'विश्वासराव' हें पद सामायिक असावें असें अनुमान होतें. छत्रपती शाहू महाराजांचे वेळीं ही केरोजी पवार फौज बाळगून कामगिऱ्या बजावीत होते. संताजी पांढरे व चंद्रसेन जाधव यांचे युध्द होऊन संताजी पांढरे पडले, तेव्हां शाहू महाराजांनीं 'गनीमास नतीजा पावावयासाठीं मनसुबा करण्या कारितां' केरोजी पवार, काळोजी भोसले व दावलजी सोमवंशी यांस हुजूर येण्या विषयीं आज्ञा केली होती. (शाहू. म. रो. ले. ९ ता० १६ जुलै १७२४)

बुबाजी, रायाजी व केरोजी या तीन बंधूंची वेगळाली तीन घराणीं विद्यमान आहेत. त्यांत बुबाजीचे घराण्याचा विस्तार फार मोठा असून त्या पासूनच धार व देवासची संस्थानें उगम पावलीं आहेत. रायाजीचें घराणें वाघाळें जिल्हा नगर (हल्लीं पुणें) येथें असून केरोजींचें खानदेशांत नगर देवळें येथें आहे; व ही उभयतां घराणीं वाघाळकर व नगर देवळेकर या नावानें प्रसिध्द आहेत.

बुबाजी यांस दोन पुत्र होते वडील काळोजी व धाकटा संभाजी. संभाजी यानें जिंजीच्या वेढ्यांत कांहीं पराक्रम केल्यावरून त्यास रामचंद्रपंत बावडेकर अमात्यानें योग्यतेस चढविलें (म. रि. मध्य. वि. ३ पृ. २८९)

इ० स० १६९४ पासून १७०० पर्यंत किंवा या नंतर कांहीं वर्षें पुढें ही, मराठे सरदारांनीं माळव्यावर ज्या स्वाऱ्या केल्या त्यांत बुबाजीचे बंधु रायाजी व केरोजी व बुबाजीचे पुत्र काळोजी व संभाजी हे पवार सरदार प्रमुखत्वान असावेत असा तर्क आहे. या पैकीं कोण कोण कोणकोणच्या सालच्या स्वारींत होते, याबद्दल अद्याप स्पष्ट आधार मिळाला नाहीं; तथापि इ० स० १६९६ त या पवार सरदारांनीं मांडवगडावर हल्ला चढविल्याचा उल्लेख देवास गॅझेटियर पृ. ३ मध्यें आला आहे. काळोजी माळव्यांत स्वारीवर आला होता या बद्दल संस्थान देवास पैकीं अलोट येथील ठाकूर जवानसिंग याजकडुन देवास गॅझेटियर करितां जी माहिती देण्यांत आली होती, तींत उल्लेख आला असून, * इकडील प्रांतांतील तत्कालीन परिस्थिती दर्शविणाऱ्या एका पोवाड्यांतही ' कालु मरेठा दख्खनवाला ' असा काळोजी विषयीं स्पष्ट उल्लेख आहे. रतनसिंग चौधऱ्या कडील कागदांतही काळोजी माळव्यांत

* जबानी माहिती रा. रा. माधवरावजी फडणीस देवास यांजकडून

आल्या बद्दल दाखला आहे. *

या नंतर कांहीं वर्षे हे पवार सरदार काय करित होते हें स्पष्ट सांगण्यास अद्याप कांही आधार मिळाला नाहीं तथापि माळव्यांत ज्या ई. सन १६९८-९९, १७०१–२, १७०३–४ व १७०५–६ या वर्षीं मराठ्यांच्या स्वाऱ्या झाल्या त्यांत हे पवार सरदार असावेत असें अनुमान करणें अयुक्त होणार नाहीं.

काळोजीचे पुत्र तुकोजी व जिवाजी यांस पुढें ई. स. १७३२ त माळव्याची वाटणी होऊन देवास वगैरे परगणे मिळाले, तेव्हां पासून ते देवासकर पवार म्हणविले जाऊं लागले.

बुबाजीचा धाकटा पुत्र संभाजी पवार हा ही जिंजीच्या वेढ्या पासून कामगिऱ्या बजावित असून छत्रपती शाहू महाराजांचे वेळीं लष्कर बाळगून मोहिमांवर जात असे, ही गोष्ट शाहु महाराजांची रोजनिशी लेखांक १ (ता० २० मे १७१४) वरून स्पष्ट आहे. संभाजी पवार मोठा कर्ता पुरूष असून दीर्घायू होता. त्यानें प्रथम मलठणास नवीन घर बांधिलें व आपले मुलांस व नातवास आणखी पाटिलक्या व वतनें खरीद करून देऊन नगर जिल्ह्यांत निरानिराळ्या ठिकाणीं वसविलें.

संभाजी पवारास तीन पुत्र होते. उदाजीराव, आनंदराव व जगदेवराव. यांपैकीं उदाजीरावाची मराठी साम्राज्याच्या इतिहासांत फार प्रसिद्धि आहे. उदाजीरावानें ई. स. १७०९ पासून माळव्यांत व गुजराथेंत मोहिमांवर मोहिमा करून ठाणीं बसवून साम्राज्याचे हक्क स्थापित करण्याचा सपाटा चालविला होता. हल्लींच्या उपलब्ध साधनां-वरून कोणकोणत्या मुख्य मुख्य मोहिमांत उदाजीराव होते हें थोडक्यांत सांगितलें म्हणजे त्यांचे कामगिऱ्यांची कल्पना होईल.

* जबानी माहिती रा. रा. बाळाभाऊ कुंटे यांजकडून

उदाजीराव आरंभीं कोणत्या सालापासून मोहिमांवर जाऊं लागले, हें निश्चित कळण्यास अद्यापि कांहीं साधन उपलब्ध झालें नाहीं; तथापि ई. स. १७०९ मध्यें उदाजीरावांनीं माळव्यांत येऊन मांडवगडावर आपलें ठाणें बसविल्याचा उल्लेख मालकमचे रिपोर्टांत आहे; यावरून उदाजीराव या सालाचे सुमारास किंवा दोन चार वर्षें किंचित पूर्वी मोहिमांवर जाऊं लागले असावेत असें अनुमान होतें. ई. स. १७०९ मधील या माळव्याचे स्वारींत कित्येक शतकें मालव राजधानीचा मान पावलेल्या या अभेद्य स्थलावर मराठ्यांचा विजयी झेंडा प्रथमतः उदाजीरावांनीं फडकाविला ही गोष्ट मराठी साम्राज्याचे, पवारांचे व त्याचप्रमाणें माळव्याचे इतिहासांत विशेष संस्मरणीय समजली पाहिजे.

यापुढें ई. स. १७१० पासून १७१७ पर्यंत उदाजीरावांचे कामगिऱ्यांचा अद्याप पत्ता लागला नाहीं; तथापि ई. स. १७०८ पासून ई. स. १७१७-१८ पर्यंत जीं कित्येक कारस्थानें चाललीं तीं त्यांत ते सातारकरांचे तर्फें कांहीं तरी कामगिरींतच असले पाहिजेत, परंतु साधनांचे अभावीं याबद्दल अधिक कांहीं लिहितां येत नाहीं.

ई. स. १७१८ त छत्रपती शाहू महाराजांनीं सय्यदांचे मदतीस बाळाजी विश्वनाथ यांज बरोबर जें मोठें सैन्य दिल्लीस पाठविलें होतें, त्या सैन्यांत सर्वांत मुख्य सरदार म्हणजे खंडेराव दाभाडे, भोसले व उदाजी पवार विश्वासराव हे होते. (रानडे म. उत्कर्ष पृ. १३६) शाहू महाराजांनीं या कामासाठीं मुद्दाम ज्या सरदारांस बोलाविलें होतें त्यांत उदाजीराव हे होते. (पे. श. पृ. ३१.) ही स्वारी नोव्हेंबर १७१८ ते जुलै १७१९ पर्यंत चालली होती.

ई. स. १७१९ च्या पूर्वीं गुजराथेंत कांहीं ठाणीं उदाजीरावांनीं सर केलीं होतीं, तीं उदाजीरावांपासून घेण्याची खटपट यावेळीं पिलाजी गायकवाड करीत होते; परंतु या कामांत पिलाजी गायकवाडांस यश

आलें नाहीं. (Rulers of Baroda page 28)

ई. स. १७२०–२१ मधील उदाजीरावांच्या हालचाली नीटशा कळल्या नाहींत, तथापी त्यांचे दिमतीस यावेळीं नारोशंकर राजे बहाद्दर असून त्यांजकडून उदाजीरावांनीं माळव्याचे वसूलाचे वगैरे काम चालविलें होतें. शिवाय या दोन्ही सालांत बाळापुरची लढाई, करीमबेगाशीं युद्ध, भडभुंज्या मोंगला वरील स्वारी इत्यादि प्रकरणें चाललीं होतीं, त्यांत उदाजीरावांनीं किंवा या पवार मडळींनीं कसकसा भाग घेतला होता हें सांगण्यांस अद्याप साधन उपलब्ध झालें नाहीं. ई. स. १७२१ त एक मराठ्यांची माळव्यावरही स्वारी झाली होती, असें मालकमनें लिहिलें आहे; (Malcolm page 64) तेव्हां तींत उदाजीराव होते असा तर्क करणें अयुक्त होणार नाहीं.

ई. स. १७२२ च्या दिसेंबर महिन्यांत बाजीरावानीं उदाजीरावांस माळवा व गुजराथ प्रांताचा निमा मोकासा सरंजामी करून दिला; तेव्हां पासून तर ते या दोन्ही प्रांतात स्वाऱ्यावर दर वर्षास जाऊं लागले.

ई. स. १७२३ च्या अखेरीस मराठे सरदारांनीं माळव्यावर स्वारी करून माळव्यांतील बादशाही सुभ्याचा मोड केला. (पे. शकावली पृ. ४८) या स्वारींत ‘ पवारांनीं जो अम्मल साधेल तो साधावा ’ असें ठरलें होतें. (शकावली. ४९) त्याप्रमाणें पुढील उद्योग उदाजी व त्यांचे बंधु आनन्दराव यांनीं चालविले.

ई. स. १७२४-२५-२६ या सालांत उदाजीरावांच्या गुजराथ व माळवा प्रांतांवर स्वाऱ्या झाल्या आहेत. या स्वाऱ्यांत गुजराथेंत लुनावाड्या पर्यंत त्यानीं आपला वचक बसविला, व तेथून मराठ्यांचे हक्क वसूल केले. (गुजराथचा इतिहास-लोकहितवादी कृ. पृ. २६८)

ई. स. १७२५ त गुजराथचा त्यावेळचा नायब सुभा सुजायत

खान याचे मृत्यूनंतर त्याचा भाऊ रुस्तमअलीखान व निजामाचा मामा हमीदखान यांचे युद्ध पेटलाद नजीक आडास येथें जुंपले होतें, त्यावेळीं उदाजीपवार व दावलजी सोमवंशी हे मराठे सरदार फौजांसह दक्षिणेंतून हमीदखानाचे मदतीस आले. यायुद्धांत शेवटीं पेटलाद परगण्यांतील वसो येथें रुस्तमअल्लीचा पराभव होऊन तो मारला गेला.

या पुढील वर्षीं उदाजीरावानीं वहींवाटी प्रमाणें आपले हक्क वसूलीचें काम चालविलें त्यावेळीं माळव्याचा बादशाही सुभेदार राजा गिरधर वहाद्दर हा होता. त्याच्याशींही मराठे सरदारांच्या पूर्वीं व याप्रसंगीं अशा अनेक चकमकी झाल्या. अखेरीस तो (गिरधर बहाद्दर) ई. स. १७२६ त सारंगपूरचे लढाईत मारलागेला (म. रि. मध्यविभाग, पृ. ३७०) यास्वारींत उदाजीराव व चिमणाजी दामोदर यांनीं सारंगपुराहून १९००० रुपये खंड वसूल केला. (Malcolm) या लढाईंत गिरधर बहाद्दरचे संबंधी राव गुलाबराम व राजा आनन्दराम हे ही पडले. (Irvine)

पुढें सन सबा अशरीन (ई. स. १७२६) मध्यें उदाजीराव व छत्रपती शाहू महाराज यांमध्यें जो तहनामा झाला त्यांत उदाजीरावांस गुजराथ व माळवा प्रांतावरील चौथाई व सरदेशमुखीचा अखत्यार दिला असल्याचें स्पष्ट आहे; व त्या प्रमाणें यावेळीं गुजराथेंत उदाजी-रावांकडून हक्क वसूलीचें काम चाललें होते, परंतु गुजराथेंत उदाजीरावा प्रमाणेंच पिलाजी गायकवाड व कदम बांडे या दाभाड्यांकडील सरदा-रांनींही त्या प्रांतांत आपला जम बसविण्याचें काम चालविलें असल्यानें गुजराथेंतील उदाजीरावांच्या प्रयत्नास या सरादरांकडून बराच अडथळा होत गेला. कित्येक वेळां उभयतांच्या चकमकी झाल्या व त्यांत अनेक प्रसंगीं उदाजीरावांची सरशी झाली; तथापि अखेरीस डभोई व बडोदा हे किल्ले उदाजीरावांस पिलाजी गायकवाडांचे स्वाधीन करावे लागले. (Malcolm) गुजराथेंत उदाजीरावांस अशी माघार घ्यावी लागली;

तेव्हां ते पुढें माळव्यांत धारेकडे निघून आले. (Later Mughals Vol. II Page 195) तथापि त्यानंतर त्यांनीं गुजराथेंतील आपला प्रयत्न अगदीं सोडून दिला असें म्हणतां येत नाहीं.

यापुढें उदाजीपवार, कंठाजीकदम बांडे व पिलाजी गायकवाड या त्रिवर्गांसही कांहीं मनसुब्याचे प्रसंगाकरितां छत्रपती शाहू महाराजांनीं हुजूर बोलावून घेतलें होतें. (शा. म. रो. ले. २९ ता. १९ मार्च १७२७)

ई. स. १७२७ चे पावसाळ्यानंतर उदाजीपवार पुनः चिमणाजी आपा बराबर गुजराथचे स्वारीवर आले. यावेळीं गुजराथचा सुभेदार सरबुलंदखान याशीं मराठ्यांचे चौथ वगैरे हक्क वसूली संबंधानें बोलणें चाललें होतें, परंतु उभयतांत करार मदार कायम झाले नाहींत; तेव्हां या मराठे सरदारांनीं आपल्या वहिवाटी प्रमाणें मुसलमानी मुलखांतून हल्ले करून खंडणी वसूल केली. त्यानंतर गोद्रा दोहद मार्गानें चिमणाजी आपा व उदाजी पवार माळव्यांत आले. रस्त्यांत चापानेर किल्ला हस्तगत केला. (Irvine)

या सुमारास प्रतिनिधीचें कारस्थान जोरांत होतें, व निजामानें ही बरीच गडबड उडवून दिली होती; तेव्हां त्याचे प्रतिकारार्थ छत्रपती शाहू महाराजांनीं सर्व सरदारांस निकडीचे हुकूम पाठविले होते. (म. रि. मध्य वि., पृ. २१७) आज्ञेप्रमाणें उदाजीरावानींही आपल्या पथकासह हजर राहून पालखेडची मोहीम फत्ते करण्यांत बाजीरावांस मदत केली. शेवटीं ई. स. १७२८ च्या फेब्रुवारींत निजाम व छत्रपती यांत मुंगीशेवगांवचा तह होऊन हें प्रकरण तात्पुरतें मिटलें.

राजा गिरधर बहाद्दर नंतर माळव्याच्या सुभ्याचें काम त्याचा मुलगा राजा भवानीराम याजकडे सोपविलें गेलें होतें. त्याशींही चिमणाजी आप्पा व उदाजी पवार यांच्या उज्जन व सिरोंज वगैरे ठिकाणीं चकमकी झाल्याचें अर्व्हिनचे पुस्तकावरून कळतें.

ई. स. १७२८ तील उदाजी पवार व मल्हारजी होळकर यांच्या माळव्या वरील स्वारी बद्दल आणखी एक दाखला उपलब्ध झाला आहे. (जमीदार धरमपुरी यांचे दफ्तरांतील एक महजर अप्रकाशित) या स्वारींत उदाजी पवार व मल्हारजी होळकर यांनीं मांडवगडावर आपलें ठाणें बसविलें होतें, परंतु त्या वेळचे माळव्यांतलि बादशाही कामदार महाराजे जयसिंग व उमरखां फौजदार वगैरेंनीं अधिक जमावा निशीं येऊन पुनः मांडवगडावर आपला कबजा कायम केला ; तेव्हां बादशाही अंमलदारांस सतावण्यासाठीं या मराठे सरदारांनीं कसबे धरमपुरी, खुजावा वगैरे बादशाही मुलखांतून हल्ले करून खंड वसूल केला व आपला मोर्चा परत फिरवून दक्षिणेंत निघून गेले.

ई. स. १७२८-२९-३० या सालांत उदाजीरावांचे नांवानें देशमुख देशपांडे यांजवर जारी झालेली १५० शाहूनही अधिक ताकीद पत्रें धार दरबारचे दफ्तरांत आहेत ; त्यांत माळवा, गुजराथ, नेमाड, खानदेश, सोंदवाडा, काठियावाड, मेवाड, मारवाड, सोरठ, खेचीवाडा, कच्छ व सिंध वगैरे प्रांतांतून मागील सालाप्रमाणें मोकास बाबीचा वसूल करण्याचा अधिकार उदाजीरावांस दिला आहे ; त्यावरून या सालाचे पुर्वीं व नंतरही या सर्व प्रांतांतून मोकासबाब वसूल करण्याचें काम उदाजीरावांकडे सोपविण्यांत आलें असून तें त्यानीं उत्तम प्रकारें चालविलें होतें हें उघड आहे.

ई. स. १७२८ च्या पावसाळ्या नंतर पुनः उदाजी पवार माळव्यांत आले ; बरोबर मल्हारजी होळकर ही होते. या उभयतां सरदारांनीं त्यावेळचा बादशाही सुभेदार दयाबहादर याचा पराभव करून पराभवाची खबर पुण्यास ता. ९ व ता. २२ अक्टोबर सन १७२८ ई. रोजीं पोंचविली. (पं. श. पृ. ५७) याच महिन्यांत चिमणाजी आपांनींहीं माळव्यावर स्वारी काढली. ते माळव्यांत आल्यावर उज्जयिनी

जवळ त्यांची दयाबहादराशीं पुनः लढाई होऊन तींत ही त्यांनीं त्याचा पराभव ई. स. १७२९ च्या आरंभीं केला. (ब्र. च. ले. ४३ ता. ४।५।१७२९) पुढें चिमणाजी आप्पा देशास परत गेले व शिंदे होळकर पवार वगैरे सरदार छत्रसालाचे बोलावण्या वरून बाजीराव बुंदेलखंडांत मोहिमेवर जाण्यास निघाले होते, त्यां बराबर बुंदेलखंडाकडे रवाना झाले. बाजीराव माळव्यांतील लष्करास घेऊन गेले असा उल्लेख शकावली पृ. ५७ मध्यें आहे. तेथें मार्च महिन्यांत महम्मदखान वंगष याचा पराभव होऊन मे महिन्यांत त्याचा मुलगा कायमखान याशीं लढाई झाली. कायमखानाकडील लष्कर लुटलें गेलें व हत्ती घेतले गेले ; तेव्हां तो १०० स्वारानिशीं पळून गेला.

या सुमारास छत्रपती शाहू महाराजांनीं चातुर्मास्य सान्निध राहून मनसुबा करण्या करितां उदाजीरावांस घेऊन येण्या विषयीं चिमाजी आप्पांस लिहिलें, (शा. रो. ले. १०७ ता. २३।४।१७२९) व बाजीरावांसही सान्निध येण्याची आज्ञा केली; त्यावरून उदाजीराव बुंदेलखंडातील मोहिम संपल्यावर बहुधा बाजीरावां बराबर दाक्षिणेंत जाऊन छत्रपतीचे दरबारांत हजर झाले असावेत. या सुमारास उदाजीरावांनीं नारोशंकर यांस माळव्यांत अम्मलदार ह्मणून पाठविलें असल्यानें त्यांजकडे " अम्मल कुल बाब कुल कानु " सुरळीत देणें विषयीं इंदुरकर नंदलाल मंडलोई यांस ताकिदीचीं पत्रें लिहिलीं. (म. वि. १ पृ. ३६३।६४) ही पत्रें बहुधा त्यांनीं दक्षिणेंतूनच लिहिलीं असावींत.

पुढें चातुर्मास्या नंतर उदाजी पवार व मल्हारजी होळकर यांनीं माळव्यांत येऊन गुदस्तसालीं मुसलमानां तर्फें राजे जयसींग वगैरेंनीं येऊन कबजा केलेला मांडवगड डिसेंबर १७२९ मध्यें पुनः काबीज केला. (शकावली पृ. ५९)

ई. स. १७३० च्या आरंभीं चिमणाजी बल्लाळ, उदाजी पवार

व मल्हारजी होळकर या सरदारांस शाहू महाराजांनीं लिहिलें कीं " सवाई जयसिंह उज्जनीस आले आहेत, त्यांचा स्नेह घरोबा पूर्वीं पासून चालत आला आहे, त्यांचे मनोधारण व रक्षण स्वामींस अगत्य या करितां उभयपक्षीं स्नेहाभिवृद्धी होईल तो अर्थ करणें. " यावरून सवाई जयसिंहाशीं मसलत होऊन मांडवगड पुनः त्यांचे स्वाधीन केला गेला असावा. (शा. म. रो. ले. १९८ ता. १९ मार्च १७३०) या नंतर चिमणाजी आप्पा पावागडचे स्वारीवर गेले होते; त्यां बराबर उदाजीराव गेले होते किंवा माळव्यांतच राहिले होते हें अद्यापि कळलें नाहीं. या सालचे या सबंधाचे कांहीं कागद उपलब्ध झाल्यास आणखी अधिक माहिती मिळेल. ई. स. १७३१ चे आरंभीं उदाजीराव दाभाड्यांचे पक्षास मिळाले होते. उदाजीरावांचे मनांत बाजीरावां विषयीं तेढ उत्पन्न झाली होती, तथापि मुख्य राज्यसत्तेशीं कोणच्याही तऱ्हेचा विरुद्धभाव त्यांचे मनांत नव्हता. ते स्वतःस छत्रपतीचे नोकर ह्मणवीत असत. शेवटीं १७३१ च्या एप्रिल मध्यें उभोई नजीक भीलापुर येथें दाभाड्यांशीं बाजीरावांची लढाई होऊन त्या लढाईंत उदाजीराव व चिमणाजी दामोदर पाडाव झाले होते; परंतु पुढें लवकरच (ता. २८-४-१७३१ पूर्वीं) बाजीरावांची व त्यांची सफाई झाली. बाजीरावांनीं उदाजी पवार व चिमणाजी दामोदर या दोघांसही वस्त्रें व हत्ती देऊन गौरविलें. (ब्र. च. ले. ३५९ ता. २८-४-१७३१)

पुढें आक्टोबर महिन्यांत मल्हारराव होळकरांस सामीलहोऊन उदाजीरावानीं माळव्यांत धार नजीक तिरळा यथें माळव्याचा बादशाही. सुभेदार दयाबहाद्दर याशीं लढाई देऊन त्यास गारद केलें. (हो. कैफियत) या स्वारींत उदाजीरावाचे धाकटे बंधु जगदेवरावही होते. (मावजी. कै. पृ. ६९–७९)

इ. सन १७३२ मध्यें उदाजीराव काय करीत होते, हें कळत

नाहीं; परंतु इ. सन १७३३ च्या जून महिन्यांत ते खानदेशांत असावेत, असें शा. म. रो. ले. ३७८ (ता० १८ जून १७३३) वरुन दिसतें. दुसरें १७३३ च्या आक्टोबरांत शाहू महाराजांनीं दुर्जनसिंहास पत्र लिहिलें त्यांत (शा. म. रो. ले. २०१ ता० ७-१०-१७३३) "कृष्णाजीपवार व उदाजीपवार त्या प्रांतांत रवाना केले आहेत त्यांस तुम्हाविशीं सांगोन साहित्य करविलें जाईल" असेंम्हटलें आहे. यावरून यावेळीं उदाजीराव माळवा, बुंदेलखंड किंवा हाडोती प्रांतांत असावेत.

ई. स. १७३४ च्या आरंभीं उदाजीराव कोंकणांत हबशाकडील मोहिमेवर होते. त्यांनी सिद्दी अंबर अफवानी याचा पराभव व शिरच्छेद वाडी पाचाड येथें केला. (ब्र. च. ले. २७८ रा. खं. ३ प्रस्तावना पृ. ३४)

ई. स. १७३४ च्या आक्टोबरांत शाहू महाराजांनीं उदाजीरावास कांहीं सनदा करून दिल्या आहेत. (मलठण दफ्तर अप्रकाशित) पुढें यावर्षाचे अखेरीस "दिल्लीहून फौजा येत आहेत तेव्हां एक माह सन्निध × फत्तेपुरामाजींच राहणें, दूरप्रांते गुजराथेकडे नच जाणें." म्हणून शाहू महाराजांनीं खास दस्तखताची पत्रें [शा. म. रो. ले. ६९ ता. १४।१२।१७३४] सरदारांस पाठविलीं, त्यांत कृष्णाजी पवार * व उदाजी पवार यांसही पत्रें पाठविलीं होतीं; या वरून कृष्णाजी व उदाजी पवार हे या सुमारास मध्य प्रांतांत होते, व त्यांकडे कांहीं गुजराथेकडील कामगिरीही सोपविलेली होती. या नंतर ता. १९ डिसेंबर १७३४ रोजीं गायकवाडांशीं कथला न करण्याविषयीं शाहू महाराजांनीं उदाजीराव यांस लिहिलें आहे; (शा. म. रो. ले. २२३ ता. १९।१२।१७३४) त्यावरून ते लवकरच गुजराथेंत गेले असावेत.

× फत्तेपुर मध्य प्रांतांत दमोचे उत्तरेस २९ मैलावर आहे.

* हे कृष्णाजी पवार सुपेकर काळोजी चे ज्येष्ठ पुत्र होत.

इ. सन १७३५ चे आरंभीं उदाजी पवार माळव्यांत होते. यावेळीं मल्हारजी होळकर व उदाजी पवार यांनीं बढवाणी प्रांतांत अधिक सख्ती केल्यावरून तसें न करण्या बद्दल छत्रपती शाहू महाराजांनी त्यांस ताकिदीची पत्रें लिहिली आहेत. (शा. म. रो. ले. २०२ ता. १२-८-१७३५) यानंतर सेप्टेंबरांत पुनः शाहू महाराजांनीं उदाजीरावांस कांहीं सनदाकरून दिल्या आहेत. (मलठण दफ्तर अप्रकाशित)

यापुढें उदाजीरावांवर छत्रपतींची नाराजी झाली. नाराजीचें कारण अद्याप नीटसें कळलें नाहीं. ब्र. च. ले. २७८ यांत " राजश्री कडील (छत्रपती कडील) बाबूराऊ यासी न पटे ऐसे जाहले " असें कारण दिलें आहे. उदाजीरावांवर ही जी छत्रपतींची नाराजी झाली तिजबद्दल उदाजीरावांस फार हळहळ वाटत होती. उदाजीराव या संबंधानें ब्रम्हेन्द्रस्वामीस मोठ्या काकुळतीनें लिहितात (ब्र. च. ले. ३०६) कीं, " यजमान श्रमाचा जाण होऊन कृपा करीत नाहींत " या वरून छत्रपतींच्या गैरमर्जीचें शल्य उदाजीरावांस कसें बोंचत होतें हें लक्षांत येईल. या नाराजीबद्दल स्वामींनींही चिमणाजी आपाकडेस उदाजीरावांची फार जोराची शिफारस केली. (ब्र. च. ले. २७८) स्वामींच्या शिफारसीप्रमाणें थोडे दिवसांनीं छत्रपतींची उदाजीरावावर पुनः बहाल मर्जी होऊन त्यांजकडे पूर्ववत कामें काजें सांगण्यांत येऊं लागलीं असावीत असें शा. म. रो. ले. ७० (ता. १-१०-१७३६) वरून दिसतें. यांत उदाजीरावांकडून गोवळकोटचे मोर्चासाठीं स्वार आणविले गेल्याचा उल्लेख असून आणखी त्यांचे पुत्र दारकोजीराव यांजबरोबर १०० स्वार पाठविण्याविषयीं छत्रपतींनीं उदाजीरावांस आज्ञा केली आहे.

या नंतर उदाजीराव माळव्यांत आले होते. १७३६ चे नवंबरांत बढवाणी प्रांतांत असतांना त्यांनीं गुदस्त साला प्रमाणेंच तेथील लोकांवर सख्ती केल्यावरून त्यांस पुनः छत्रपती शाहू महाराजांनीं

ताकिदीनें लिहिलें होते. (शा. म. रो. ले. २०३ ता. २९-११-१७३६)

शाहू महाराजांची रोजनिशीं ले. ९३ (ता. २२-११-१७४७) वरून ई. स. १७४७ पर्यंत परगणे खरगोण कडील मोकासबाबेचा कांहीं अधिकार उदाजीरावांकडेस होता असें दिसतें.

अशी ही मराठी साम्राज्याच्या विस्तारा करितां उदाजीरावानीं ई. स. १७०९ पासून केलेल्या खटपटींची अगदीं त्रोटक हकीगत आहे.

ही वरून उदाजीरावांच्या कर्तबगारीची व पराक्रमाची चांगली कल्पना होते. माळवा व गुजराथ या ठिकाणीं आरंभीं मराठ्यांचा जम उदाजीरावांनींच बसविला. उदाजीरावांचे अंगीं विलक्षण धाडस, रणशौर्य, हातीं घेतलेली कामगिरी मोठ्या हिम्मतीनें व चिकाटीनें शेवटास नेण्याची हतोटी इत्यादि गुण अगदीं अलौकिक होते ; व यामुळेंच ते मराठ्यांचे दळांत फार चमकत होते. बादशाही मुलखांत तर त्यांचा दरारा इतका बसला होता कीं, त्यांचें नांव ऐकतांच मुसलमान अधिकाऱ्यांची अगदीं गाळण उडून जाई व तीमुळें ते घाबरून सैरावैरा पळत सुटत. उदाजीरावांस ते जातील तेथें विजय हा मिळावयाचाच अशीं त्या काळीं त्यांची प्रसिद्धी होती व यामुळेंच माळवे प्रांतांत त्यां संबधानें " जिधर उदा उधर खुदा " अशी अन्वर्थक ह्मण प्रचारांत आलेली ऐकण्यांत येते. उदाजीरावांच्या असाधारण पराक्रमा विषयीं बखरकारांनीं जे उद्गार काढले आहेत, त्यांत वरील ह्मणीचे प्रतिबिंब जागजागीं दृष्टीस पडतें. ब्रह्मेन्द्र स्वामींचे पत्रव्यवहारावरून तर ही गोष्ट अधिक स्पष्ट होते. उदाजीरावांची ब्रह्मेंद्र स्वामीवर फार निष्ठा असून स्वामींचे उदाजीरावांवर पराकाष्ठेचें प्रेम होतें. ब्रह्मेंद्र स्वामींचे पत्रांतून उदाजीरावांचे पराक्रमा विषयीं मोठ्या गौरवाचे उल्लेख असून संकट समयीं त्यांस धीर देऊन योग्य उपदेशही स्वामींनीं केला आहे ; व प्रसंगीं पाठ थोपटून उत्तेजनही

दिलें आहे. स्वामींनीं उदाजीरावांस लिहिलेली दोन पत्रें रा. ब. पारसनीस यांनीं आपल्या ब्रह्मेंद्र स्वामीचे चारित्रांत दिलीं आहेत (ले. ३०५-३०६) त्यांतील एकांत " क्षत्रियकुलावंतस रणधीर उदाराम पवार " व दुसऱ्यांत " सहस्त्रायु चिरंजीव विजयी भव रणधीर रणशूर अर्जुनतुल्य उदाजी पवार " असा मायना स्वामींनीं लिहिला आहे. इतका गौरवून मायना दुसऱ्या कोणत्याही सरदारास स्वामींनीं लिहिलेला दिसत नाहीं. यावरून उदाजीरावांचे पराक्रमाविषयीं स्वामींचे मनांत केवढा आदर व अभिमान वसत होता हें लक्षांत येईल. छत्रपती शाहू महाराजांजवळही उदाजीरावांचें फार वजन होते व शाहू महाराजही उदाजीरावांस फार चाहत असत. बाजीराव पेशव्यांचे मनांत उदाजीरावांचे पराक्रमाविषयीं कशीं जाणीव होती हें मल्हारराव होळकरांकडून शेंदव्याचे घाटांत बाजीराव व उदाजीराव यांचा समेट घडवून आणण्याचा जो प्रसंग होळकरांचे कैफियतींत वर्णिला आहे त्यावरून लक्षांत येणार आहे.

मुंबई येथें व्हिक्टोरिया गार्डन्स मधील आजबखान्यांत एक साडेपांच फुट लांबीची पितळी तोफ ठेविली आहे, तीवर उदाजी पवारांचें नांव कोरलेलें आहे. उदाजीराव कोकणांतील मोहिमांवर होते त्यावेळीं त्यांनीं ही तोफ लढाईत जिंकून आणिलेली असावी. लढाईत पराक्रम करून मिळविलेलें विजय चिन्ह ह्मणून त्यांनीं तीवर आपलें नांव कोरून ठेविलें हें उघड आहे. या तोफेवर ती तयार झाली त्यावेळचें दुसरे ओतीव नांव आहे त्यावरून ती मूळची डच अथवा बलंदेजी यांची असावी असें वाटतें. असो; एकंदरींत उदाजीराव हे खरोखर मोठे शूर, कर्ते व तेजस्वी पुरूष असून मराठ्यांच्या दळांत त्यावेळीं प्रमुख ह्मटले जात होते. परंतु ते स्वभावानें फार तापट व अत्यंत मानी व आग्रही असल्यामुळें त्यांचे उत्कर्षास ई. स. १७३६ नंतर पुढें आळाच बसत गेला. मालकम साहेबांनीं उदाजीराव १७३१ नंतर लवकरच मरण पावले असें लिहिलें आहे, तें बरोबर नाहीं. हल्लींच्या उपलब्ध

साधनांवरून ते पानिपतचे प्रसंगा पूर्वी १ वर्ष म्हणजे ई. स. १७६० त मरण पावले असें दिसतें. (इचलकरंजीकरांचा इतिहास ले. ४४

आतां उदाजीरावांचे धाकटे बंधु आनंदराव यांच्या कामगिऱ्या विषयीं सध्यांच्या उपलब्ध साधनांत काय मिळतें तें पाहूं.

आनंदराव व उदाजीराव यांचे वयांत फार अंतर नव्हतें. ते वयानें साधारणतः बरोबरीचेच होते व ते स्वारी शिकारीवरही उभयतां बरोबरच जात असत; यामुळें उभयतांनीं चालविलेल्या मोहिमांतून आनंदरावाचे वेगळे स्वतंत्र पराक्रम निदर्शनास येऊं शकले नाहींत; तथापि आनंदराव पराक्रमांत कमी होते असें म्हणण्याचें कांहीं कारण नाहीं. उदाजीरावांच्या तापट स्वभावामुळें कोठें काम बिघडण्याचा प्रसंग आल्यास आनंदरावांच्या धीमेपणाचा उपयोग त्या प्रसंगीं होत असे व तोच धीमेपणा पुढें आनंदरावांच्या उत्कर्षास कारण झाला. ग्रॅन्ट डफ साहेबांनीं आनंदरावांचे आंगच्या या गुणाची तारीफ केली आहे.

सन सित अशरीन व सबा अशरीन सालांत गुजराथेंत पिलाजी गायकवाडाशीं उदाजीरावांच्या ज्या झटापटी होत होत्या, त्यांत त्यांचे बंधु आनंदराव आपले पुत्र यशवंतराव यांसह असल्याचे अर्व्हिननें लिहिलें आहे. त्यावरून गुजराथ व माळव्याचे उद्योगांत उदाजीरावांस आनंदरावाचें बहुधा आरंभा पासून साह्य असावें असें अनुमान करणें अयुक्त होणार नाहीं.

सन समान अशरीन मध्यें (सन १७२८ च्या जानेवारींत) उदाजीरावां प्रमाणें आनंदरावांसही आपले लष्करांत सत्वर येण्याविषयीं बाजीरावांकडून पत्र गेलें होतें. (धार दरबारचे दफ्तरांतील एक अप्रकाशित पत्र) यावेळीं आनंदराव आपल्या पथकानिशीं गुजराथेंत काम-

गिरीवर होते. यावेळीं निजामाविरूद्ध जें कारस्थान चाललें होतें त्यांत बाजीरावांनीं निजामास हुलकावणी देण्यासाठीं बऱ्हाणपुराकडे कांहीं सैन्य पाठवून आपण स्वतः गुजराथेंत शिरले होते; तेथून लष्करांतूनच त्यांनीं आनंदरावांस सत्वर येण्याविषयीं हें * पत्र लिहिलें आहे.

सन सल्लासीन (ई. स. १७२९–३०) सालांतली बाजीरावांनी देशमूख व देशपांडे यांजवर जारी केलेलीं १०।१२ ताकीदपत्रें उपलब्ध झालीं आहेत. (मलठणदफ्तर अप्रकाशित) तीं उदाजी व आनंदराव यांचे नांवानें सामलाती आहेत. त्यांत माळवा वगैरे प्रांतांत या उभयतांकडे मोकासा आहे त्याप्रमाणें सालमजकुरींही करार आहे, असें म्हटलें आहे. यावरून उदाजी व आनंदराव हे उभयतां कामगिऱ्यांवर बराबर जात असत या आमच्या विधानास पुष्टी मिळत असून ई. स. १७२९ च्या पूर्वीं ही आनंदराव माळवा वगैरे प्रांतांतून मोकासबाबीच्या वसूलाचे काम करीत होते ही गोष्ट स्पष्ट होते.

ई. स. १७३१ त उदाजीरावांप्रमाणेंच आनंदरावही दाभाड्यांचे पक्षास मिळाले होते, तथापि त्यांनीं उदाजीरावांप्रमाणें बाजीरावांशीं तेढ ठेविली नाहीं ; यामुळें या प्रसंगानंतर उदाजीरावांवर नाराजी राहून वरिष्ठांचे कृपेचा ओघ सहजच आनंदरावांकडेस वळला. (Grant Duff.) मोकास बाबीच्या वसूलाबद्दलची २९।३० ताकीदपत्रें सल्लास सल्लासीन व अर्बा सल्लासीन (ई. स. १७३२–३३) या सालांत स्वतंत्र आनंदरावांचे नावानें देशमूख व देशपांडे यांवर जारी झालेलीं उपलब्ध आहेत. या ताकीदपत्रांत माळवा, गुजराथ, नेमाड, खानदेश, सोंदवाडा, बागड वगैरे प्रांतांतून मोकासबाबीचा वसूल करण्याचा अधिकार स्वतंत्रपणें आनंदरावांस

---

* हें पत्र खुद्द बाजीरावांच्या हातचें आहे. त्यांत त्यांनीं आनंदरावांस ‘साखेडीयावरून सोनगडावरून डबईतून लष्करांत’ येण्यास लिहिलें आहे.

दिलेला आहे. या ताकीदपत्रांवरून या सालांत आनंदरावांनीं वर लिहिलेल्या प्रांतांतून मोहिमा करून स्वराज्याच्या हक्काच्या वसूलीचें काम केलें होतें हें स्पष्ट आहे. याशिवाय या पुढील दोन तीन सालांत झालेल्या उत्तरेकडील स्वाऱ्यांतही ते हजर असल्याचे दाखले मिळाले आहेत. (अप्रकाशित.) आनंदरावांकडेस पंधरा हजार स्वार सरंजामास होते. (का. सं. पत्रें. या. ले. ४९७)

माळव्याची वांटणी झाली तींत धार प्रांत व त्याच्या आसपासचे कांहीं परगणे शिवाय कांहीं जवळच्या रजपूत सरदारांकडील खंड असे आनंदरावांस त्यांचे हाताखालील लोकांच्या पोषणार्थ देऊन त्यांस माळव्यांत मुद्दाम कायम करण्यांत आलें होतें ; यांत मुख्यतः हा हेतु होता कीं, गुजराथच्या बाजूनें माळव्याच्या पश्चिम सरहद्दीवर येणाऱ्या मुसलमानांच्या व तिकडील विरोधी मराठे सरदारांच्या स्वाऱ्यांपासून माळव्याचें रक्षण व्हावें. (Grant Duff Vol. I.) माळव्याचे वांटणी शिवाय उत्तरेकडील अजमेर, प्रयाग वगैरे सुभ्यांत होणाऱ्या स्वाऱ्यांवरही ठरीव हिस्सा आनंदरावांस मिळत होता (धार दरबार दफ्तर अप्रकाशित.)

माळव्याची वांटणी होऊन आनंदरावांस धार प्रांत मिळाल्यावर त्यानीं धार येथें आपलें वास्तव्य कायम केलें व ह्मणूनच त्यांस धार संस्थानचे संस्थापक समजण्यात येतें. आनंदरावांस स्वतंत्र सरदारीचा अधिकार मिळाल्यानंतर ते फार दिवस वांचले नाहींत. ते स्वारीहून परत येत असतां (विस्तारनामा अप्रकाशित) ई. स. १७३६ च्या जून महिन्यांत उज्जयिनी येथें सर्पदशानें मरण पावले. (राजवाडे खंड ११ ले. २० व धार दरबार दफ्तर अप्रकाशित.) मालकम साहेबांनीं आनंदरावांचा मृत्यु ई. स. १७४९ त झाला असें लिहिलें आहे, तें बरोबर नाहीं. आनदरावांची सुंदर अष्टपैलू नक्षीदार संगीन छत्री

उज्जयिनी येथें मंगळेश्वरानजीक मंदाकिनी घांटावर आहे. आनंदराव स्वारीहून परत उज्जयिनिस आले त्यावेळा त्यांचे धाकटे बंधु जगदेवराव हे ही त्यां समागमें होतें. आनंदरावांचा मृत्यु अगदीं अल्पवयांत झाल्यामुळें त्यांच्या स्वतंत्र कर्तबगारीस पुढें वाव मिळाला नाहीं व त्यांचे हातून पुढें मराठी साम्राज्याविषयीं अधिक महत्वाची कामगिरी बजाविली जाऊन त्यांचे विशेष पराक्रम व मुत्सद्दीपणा निदर्शनास आला नाहीं.

उदाजीरावांचे दुसरे बंधु जगदेवराव यांजकडेसही मराठ्यांचे लष्करांत सरदारीचा अधिकार असून तेही मोहिमांवर जात असत, परंतु हल्लींच्या उपलब्ध साधनांमध्यें त्यांचा स्वतंत्रपणें उल्लेख फारसा कोठें आढळत नाहीं. ई. स. १७३१ चे आक्टोबरांत धार नजीक तिरला गांवाजवळ बादशाही सुभेदार दयाबहाद्दर याशीं जी लढाई झाली तींत जगदेवराव हजर असून त्यांनीं हत्तीवर चढून दयाबहाद्दराचें शिर उडाविलें असा उल्लेख चितेगांवकर पवारांचे कैफियतींत आहे. (मावजी. कै. पृ. ७२)

धार येथील शाखेचे संस्थापक आनंदराव पवार यांचे मागें त्यांचे पुत्र यशवंतराव हे उदयास आले. मराठी राज्याचा माळव्याबाहेर विस्तार होण्यासाठीं मुख्यत्वें करून ज्या सरदारांनीं महत्वाच्या कामगिऱ्या बजाविल्या व त्यास साम्राज्याचें स्वरूप आणिलें त्या सरदारांत मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे, यशवन्तराव पवार व पिलाजी जाधव हे प्रमुख होते.

यशवन्तराव पवार हे आपले बापाचे हयातींतच कधीं त्यां बरोबर तर कधीं स्वतंत्रपणें मोहिमांवर जाऊं लागले होते. ई. स. १७२५-२६ सालीं ते गुजराथेंत आनंदरावां बरोबर उदाजीरावांचे साह्यास गेले असल्याचें अर्स्किननें नमुद केलें आहे. परंतु या पुढील सहा सात वर्षांतील त्यांच्या कामगिरीचे स्पष्ट दाखले अद्याप उपलब्ध

झाले नाहींत, तथापि या सालांत देखील ते मोहिमांवर गेले असावेत असें अनुमान करण्यास जागा आहे.

पुढें १७३४ च्या जून, जुलैंत राणोजी शिंदे मल्हारजी होळकर यांजबरोबर धारचे यशवंतराव पवार व देवासचे तुकोजी पवार माळव्यांत मोहिमेवर होते. (राजवाडे खंड ६ ले. ९६-९७) यशवंतरावांचे वडील आनंदराव पवार नुकतेच दक्षिणेंत परत गेले होते. (धार दरबार दफ्तर अप्रकाशित) या माळव्यांतील मोहिमेंत त्रिवर्ग (शिंदे, होळकर व पवार) सरदारांनीं तमाम गिराशी यांचा बंदोबस्त केला. पठारीस ठाणें बसविलें. लालगडवाला * लुटला, वगैरे कामगिऱ्या बजावून छावणी सोंदवाड्यांत व आगर परगण्यांत केली होती. या शिवाय या सरदारांची यावेळीं दिल्ली येथील वकीलामार्फत बादशाहाकडून चौथाईच्या सनदा, स्वारीचा खर्च व माळव्याचे सुभ्याची सनद मिळविण्याची खटपट चालली होती.

माळव्याची वांटणी झाल्यापासून माळवा प्रांताची सर्व व्यवस्था शिंदे, होळकर व पवार यांजकडे सोपविली गेली असल्यानें ई. स. १७३५ त ही सरदार मंडळी मुख्यतः माळव्याचे व्यवस्थेंत व माळव्यापुढील उत्तरेकडचे मुलखांत विरुद्ध पक्षियांशीं झगडून सुभ्याच्या व चौथाईच्या सनदा मिळविण्याचे कामांत गुंतली होती ; व त्यासाठीं ई. स. १७३५ च्या पावसाळ्या नंतर या सरदारांनीं एक मोठी जोराची उचल केली. बादशाही मुलखास व त्याचे ताब्यांतील संस्थानिकांस त्रासवून सोडण्याचे इराद्यानें त्यांनीं मेवाड, मारवाड व अजमेरचा सुभा या प्रांतात स्वाऱ्या करण्यास सुरवात केली. ई. स. १७३५ च्या नोव्हेंबरांत माळव्यांत

* लालगड व पठारी या नावांची माळव्यांत अनेक स्थळें आहेत ; परंतु वरील दोन्ही आगर परगण्याचे दक्षिणसरहद्दीवर आहेत.

बाजीराव येऊन पोहोंचल्यावर या स्वाऱ्यांस अधिकच जोर आला. जयसिंगानें बादशहास पूर्वींच लिहून सांगितले होतें कीं, माळव्याच्या सुभ्यावर बाजीरावांची नेमणूक झाल्यावांचून मराठ्यांच्या स्वाऱ्यांचा हा सालोसाल चा त्रास चुकणार नाहीं. या संबंधाची वाटाघाट दिल्ली दरबारांत कैक महिने चालू होती. यादगारखान काश्मिरी कांहीं करारमदार करून पेशव्यांचे वकीलास घेऊन दिल्लीस गेला होता. (राजवाडे खं. ११ ले. २०) शेवटीं बादशहानें जयसिंगाची सूचना मान्य करून सनदा यादगारखाना बरोबर देऊन त्यास नजाबतअलीखान व कृपाराम यांसह जयसिंगा कडे पाठविलें. ता० १६ जुलै १७३६ रोजीं जयसिंग व बाजीराव यांची भेट धोलपूर येथें झाली. याप्रसंगीं बाजीरावां बरोबर त्यांचे मुख्य सेनानी व सल्लागार राणोजी सिंदे, मल्हारराव होळकर व यशवंतराव पवार हे होते. (Irvine) जयसिंगा कडून सल्लख्याचे बोलणें सुरू होऊन बाजीरावास माळव्याची नायब सुभेदारी दिल्याचें जाहिर करण्यांत आलें; परंतु सनदा दिल्या नाहींत. होईल तितके बोला चालीवर काम भागवून सनदा देऊं नयेत, अशी वजीराची यादगारखानास ताकीद होती ; यामुळें सनदा दिल्या नाहींत. बाजीरावांस ही बातमी अगोदरच कळलेली होती ; तेव्हां बाजीरावांनींही आपल्या मागण्या वाढवून अधिक चढाईचें बोलणें सुरू केलें. यामुळें या प्रसंगीं तडजोड झाली नाहीं ; तेव्हां पुढील मनसुब्या करितां आपल्या सरदारांसह आगस्टचे सुमारास बाजीराव दाक्षिणेंत निघून आले. (म. रि. मध्य विभाग १ पृ. ३९७)

यशवंतराव पवारांचे वडील आनंदराव हे वरील मोहिमेंत होते ते ई. स. १७३६ च्या जून महिन्यांत उज्जयिनीं येथें अपघातानें मरण पावले. तेव्हां आगस्ट महिन्यांत बाजीराव पुण्यास आल्यावर यशवंतराव पवारांस त्यांचे वाडिलांचे सरदारीवर नेमण्यांत आलें.

(मध्य वि. १ पृ. ३३८ व धार दरबार दफ्तर) अधिकार मिळाल्यावर लवकरच यशवंतराव पुण्याहून मोहिमेवर निघाले. त्यांचे ता. ११ सेप्टेंबर १७३६ ई. चें हिंगण्यांस पत्र आहें त्यांत आह्मी मजल दर मजल पुढें जातों. “ हिशेव पाहणें अथवा करणें ते पुणियास येऊं तेव्हां करूं ” (राजवाडे खं ६ ले १०६) असें यशवंतरावानीं लिहिलें आहे. यावरून गुदस्त सालाप्रमाणें उत्तरे कडील प्रातांत पुनः मोहिम चालविण्या करितां ते माळव्या कडेस आलें असावेत. ठरल्या प्रमाणें पुढें बाजीराव हीं ई. स. १७३६ च्या नोव्हेंबरांत पुनः दिल्लीचे स्वारीस निघाले. निरनिराळ्या मोगल सरदारांच्या फौजा एकत्र न होऊं देतां त्यांस वेगवेगळें गांठून त्यांचा पाडाव करण्याचा बाजीरावाचा विचार होता; व त्याप्रमाणें अशा वेगवेगळ्या कामावर आपले कडील सरदारांची ही त्याणें योजना केली होती. ई. स. १७३७ च्या मार्च महिन्यांत मल्हारराव होळकरांस दुआबांत सादतखानाचे मुकाबलयास पाठविलें होतें; व पुढे स्वतः फौज घेऊन एकदम बाजीराव दिल्ली जवळ जाऊन दाखल झाले. यामुळें तेथें फारच गोंधळ उडाला. बाजीरावांनीं झीलचे तलावानजीक आपले फौजेचा तळ टाकिला होता. ही स्वारी कित्येक महिने चालली होती. ई. स. १७३७ च्या एप्रील महिन्यांत झीलचे तलावाजवळ जी लढाई झाली तींत यशवंतराव पवारांनीं चांगले पराक्रम केले. (ब्र. च. ले. २७ ता. ९-४-१७३७) या स्वारींत देवासचे जिवाजी व तुकोजी पवार ही होते.

याच वेळीं निजामानेंही मोठी फौज व तोफखाना घेऊन उत्तरेंत येण्याची तयारी चालविली होती. पावसाळा संपताच मोठ्या तयारीनिशीं तो माळव्यांत चाल करून आला. निजाम येतोसें पाहून बाजीराव ही त्यावर चाल करून जाण्यासाठीं फौजांसह निघाले. बाजीराव नेमाडांत खरगोण जवळ नर्मदा उतरले. बाजीरावांच्या फौजांची व निजामाची ई. स. १७३७ च्या डिसेंबरांत भोपाळ नजीक गांठ पडली.

(ता. १३ डिसेंबर १७३७ ते ८ जानेवारी १७३८ ई.) या लढाईंत निजामाचा चांगलाच कोंडमारा केला गेला. हिला भोपालची लढाई ह्मणतात. ही मराठ्यांचे इतिहासांतील एक प्रसिद्ध लढाई आहे. या लढाईंतील यशवंतराव पवारांचे पराक्रम नांवाजण्या सारखे आहेत. (ब्र. च. ले. ३३,३४,३५ व ३६) भोपाळची लढाई झाल्यावर तह पूरा करून घेण्याकरितां जिंकलेल्या मुलखांत अम्मल बसाविण्याचें काम चाललें होतें; तें जुलै पर्यंत आटोपून बाजीराव परत गेले. शिंदे, होळकर, पवार वगैरे सरदार मंडळी पाठीवर ठेविली होती. (मध्य वि. १ पृ. ३७४)

ई. स. १७३८ च्या पावसाळ्या नंतर पोर्तुगीझांवर जंगी मोहीम करण्यासाठीं सर्व मोठ मोठे सरदार फौजांसह तिकडे पाठविण्यांत आले. या मोहिमेवरच पुढें हे माळव्यांतील प्रमुख सरदारही गेले. ई. स. १७३९ च्या जानेवारींत ही वसईची मोहीम जोरांत होती. त्या वेळीं तारापुरचे हल्ल्यांत यशवंतरावांनी चांगले शौर्य दाखविलें. (ब्र. च. ले. ४९) या स्वारींत देवास चे तुकोजी पवार ही हजर होते. वसईचे कारस्थान रंगांत येऊन चिमाजी आप्पा व मोठमोठ्या फौजा वसई काबीज करण्यांत गुंतल्या होत्या; इतक्यांत नादिरशहाची धाड दिल्लीवर आली. मराठ मंडळाची व छ. शाहू महाराजांची इच्छा बादशहास मदत करून नादिरशहास घालवून द्यावा अशी होती; परंतु सर्व फौजा वसईकडे गुंतल्यामुळें, बाजीरावांस एकदम जोरानें हिंदुस्थानांत जातां आलें नाहीं. माळव्याची फौज मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व यशवंतराव पवार यांचे हाताखालीं पाठविण्या बद्दल बाजीरावांनीं पिलाजी जाधवांस लिहिलें होतें. (राजवाडे खं. ६ ले. १३०) त्या प्रमाणें वसई कडील काम आटोपतांच हे सरदार फौजांसह रवाना झाले व नंतर बाजीरावही नादिरशहाचे स्वारीस निघाले; परंतु ता. २२ मे चे सुमारास बाजीराव बऱ्हाणपुराजवळ आले, तेथें नादिरशहा निघून गेल्याची

खबर त्यांस कळली. स्वारीवर निघालेली सरदार मंडळी माळव्यांत येऊंन पुढें बुंदेलखंडांत गेलीं. बाजीरावही बुंदेलखंडांत आले. तेथें ता. १ जुलै १७३९ ई. रोजीं छत्रसालाचे मुलाशीं एक करार झाला त्यांत बाजीरावांनीं मल्हारराव होळकर, राणोजीं शिंदे व यशवंतराव पवार यांस आपल्यातर्फें मध्यस्थ ह्मणून ठेविलें होतें. (तह करारमदार पृ. ९) यानंतर बाजीराव परत पुण्यास आले. (शकावली पृ. ८४)

पावसाळा झाल्यावर पुनः स्वारीवर निघाले. आक्टोबर महिन्यांत बाजीरावांचा मुक्काम धारेजवळ होता. (रा. खं. ६ ले. १४१) माळव्यांत होळकर, शिंदे, पवार यांचे निसबतीस असलेले समायिक महाल वगैरे हुजूर ठेवण्याचें ठरलें होतें. (खं. ६ पुरंधरे यादी पृ. २३) त्या प्रमाणें बोली घातल्यावरून यशवंतराव पवारांनीं धार व सोनगड ही दोन्ही स्थळें श्रीमंत स्वामीकडे देऊन कृपासंपादन केली. (राज. खं ६ ले. १४१ ता. ३-१०-१७३९)

या नंतर दक्षिणेंत नासिरजंगाचे स्वारीवर जाऊन बाजीराव पुनः १७४० च्या मार्च महिन्यांत उत्तरे कडे आले; ते पुढें खरगोण जिल्ह्यांत रावेरखेडी येथें रेवातीरीं ता. २८ एप्रिल १७४० रोजीं वारले. *

बाजीरावांचे मृत्यू नंतर निजामानें पुनः गडबड सुरू केली. त्यानें मोठा " उपद्याप मांडून अजिमुल्लाखानास माळव्याची सुभेदारी

* ई. सन १९२५ पासुन रावेरखेडी येथें बाजीरावांचे समाधी जवळ त्यांचे पुण्यतिथीचा वार्षिक उत्सव देवास पाती २ चे दिवाण रावसाहेब भाजेकर यांचे प्रयत्नानें सुरूं झाला आहे.

सांगून वस्त्रें देऊन रवाना केलें." त्या बरोबर पंधरा हजार फौज होती. या वेळीं शिंदे, होळकर, पवार ही सरदार मंडळी माळव्यांत नव्हती, दक्षिणेंत होती. (राजवाडे खं. ६ ले. १४९ ता. ६-७-१७४०) लवकरच या मंडळींनीं माळव्यांत येऊन पुनः मुलुख ताब्यांत घेण्यास सुरवात केली. मल्हारराव होळकरांनीं धार फत्ते झाल्याचें वर्तमान पुण्यास कळविलें. ही बातमी पुण्यास ता. ९ जानेवारी १७४१ रोजी पोहोचली. (पे. शकावली पृ. ९०) अर्थात यावेळीं धारेवर पुनः मुसलमान सुभेदाराचा कबजा झाला होता. या स्वारींत यशवंतरावं पवार हे असलेच पाहिजेत ; कारण होळकर, सिंदे व पवार या त्रिवर्गा कडे माळव्याची सोप पूर्वींच झालेली होती.

या नंतर वर्ष दीड वर्ष यशवंतराव पवार माळव्यांतच होते. ई. स. १७४१ च्या मे महिन्यांचे १८ वे तारखेस "ढवळपुरचे मळीस मुक्काम असतां," सवाई जयसिंग माळवा प्रांताचे सुभेदार यांची नाना-साहेब पेशवे यांनीं भेट घेऊन माळव्या संबधानें उभयतांचे तहाचे बोलणें ठरलें. माळव्याची सनद मिळविण्याचें जें हें कारस्थान कित्येक वर्षां पासून चाललें होतें, त्यांत यशवंतराव पवार हे अव्वल पासून अखेर पर्यंत होते. अखेरीस जामीनदारी बद्दल कबुलायत लिहून देण्यांतही ते होते, हें पुढें येईलच. या नंतर बाळाजी बाजीराव परत देशास गेले व यश-वंतराव पवार माळव्यांत राहिले, ते पुढें "पुष्करावर सवाई जयसिंग यां पाशीं छावणी करून होते." तेथें त्यांनीं जयपूरचे राजे सवाई जय-सिंग व जोधपूरचे राजे अभयसिंग (धोकलसिंग) यांचा सल्ला घडवून आणिला. (ब्र. च. ले. ३४८) यावेळीं जयपूरकर सवाई जयसिंग व जोधपूरचे अभयसिंग या उभयतांत वांकडें पडलें होतें. (Malcolm Vol. I Page 73) यशवंतरावाचे प्रयत्नानें उभयतांत तह झाला. तहाचा उल्लेख मालकमनें केला आहे व त्या संबंधानें ब्रह्मेंद्र स्वामीस

यशवंतरावांकडील काशी नानाजी व विसाजी गणेश * यांनीं ता. १७ सेप्टेंबर १७४१ च्या पत्रांत कळविलें आहे कीं, " ज्या कार्यास यशवंतराव पवार गेले होते तें कार्य धोकलसिंग × व सवाई जयसिंग यांचा सल्ला जाला यश आलें. सर्व प्रताप स्वामींच्या आशीर्वादाचा आहे. "

पुढें १७४१ च्या डिसेंबर महिन्यांत पेशवे बाळाजी बाजीराव साताऱ्याहून आल्यावर हिंदुस्थानांत स्वारीस जाण्यास निघाले. (पे. श. पृ. ८७) बराबर शिंदे, होळकर व पवार (यशवंतराव) होते. (थोरले शाहू महाराज चरित्र पृ. ८२) या वेळीं रघूजी भोसले ही हिंदुस्थानचे स्वारीवर गेले होते.

पेशवे शिंदे, होळकर व पवार या सरदारांसह खानदेश, नेमाड मधून माळव्यांत उतरल्यावर त्यांनीं प्रथमतः गढा मंडळाकडे कूच केलें; व तेथील ठाणीं मार्च एप्रिलांत काबीज केलीं. पुढें थेट अलाहबादे पर्यंत चालून जाण्याचा बेत होता, परंतु मध्यंतरी रघूजी भोसल्यांचे चिथावणी वरून दमाजी गायकवाड व बाबूजी नाईक यांनीं माळव्यावर स्वारी केली; तेव्हां अगोदर माळव्याकडील बंदोबस्त करणें भाग झालें.

---

* काशी नानाजी (देखणे) हे धार येथील शिकेनवीस घराण्याचे मूळ पुरूष व विसाजी गणेश (केळकर) हे मुजुमदार घराण्याचे मूळ पुरूष होत.

× धोकलसिंग हा जोधपूरच्या अभयसिंगाकडील एक सरदार व सैन्यावरील अधिकारी असल्याचें Rulers of Baroda Page 38 मध्यें ह्मटलें असून सरदेसाई यांनीं (मध्य वि. ३ पृ. ९१ मध्यें) " अभयसिंग उर्फ धोकलसिंग " असें ह्मटलें आहे; तेव्हां कदाचित धोकलसिंग हें अभयसिंगाचें नांवही असेल.

माळव्यांतील बंदोबस्त पाहून विशेष लढाईचा प्रसंग न आणितां गायकवाडांनीं ही मागें पाय घेतला. बाजीरावांचे मृत्यु नंतर धारेवर पुनः बादशाही कबजा झाल्या मुळें मराठ्यांनीं स्वारी करून पुनः धार काबीज केली, हें वर आलेंच आहे; शिवाय या वेळीं गायकवाडांचे स्वारी मुंळ ही माळव्यांत आणखी गडबड झाली; तेव्हां बाळाजी बाजीरावांनीं १७४२ च्या पावसाळ्यांत माळव्यांत छावणी करून त्यावेळीं यशवंतराव पवारांस पुनः आपल्या तर्फें धारेस कायम केलें; व गुजराथेंतून गायकवाडांनीं पुनः माळव्यांत येऊं नये असा बंदोबस्त केला. (मध्य. वि. २ पृ. ४३)

पुढें ई. स. १७४२–४३ त नानासाहेब पेशव्यांनीं आपले सरदारांचे मार्फत माळवा, बुंदेलखंड व बंगाल पावेतोंच्या प्रदेशांत जिकडे तिकडे धुमाकूळ उडवुन दिली. यावेळीं नानासाहेबां बराबर जे सरदार होते त्यांत शिंदे (राणोजी) होळकर (मल्हारजी) व पवार (यशवंतराव) व पिलाजी जाधव हेच प्रमुख होते. (शा. मं. बखर पृ. ७८) या सरदारांचा एकंदर बादशाही मुलखांत मराठ्यांचे चौथाई हक्क मिळविण्यासाठीं पुनः हा ज़ोराचा प्रयत्न असून त्यांत प्रतिस्पर्धी रघूजी भोसल्यांचे प्रयत्नास आळा घालण्याचाही हेतु होता. शेवटीं उद्दिष्ट हेतु प्रमाणें भोसल्यांचाही पराभव झाल्या नंतर महम्मदशहानें माळव्याच्या सुभेदाराची सनद पेशव्यांस देऊं केली. त्या वेळीं सनदेंतील शर्तीं बद्दल राणोजी शिंदे, मल्हारजी होळकर, पिलाजी जाधव व यशवंतराव पवार या चौघां सरदारांनीं एक जामीनकतबा ह्मणजे जामीनदारी बद्दल कबुलायत ता. २१ एप्रिल १७४३ ई. रोजीं लिहून दिली आहे. (Malcom page 78. मध्य. वि. पृ. ९९) तीवरून व वर दिलेल्या सर्व आधारां वरून या एकंदर कारस्थानांत यशवंतराव पवारांचे आरंभा पासून कसें अंग होतें व त्यावेळीं मराठ मंडळांत,

दिल्लीचे बादशाहींत व दुसऱ्या रजपूत राज्यांत यशवंतरावाचें केवढें महत्व व योग्यता मानली जात होती हें चांगलें लक्षांत येतें.

या पुढें नानासाहेब पेशव्यांनीं शिंदे, होळकर, आवजी कवडे, गोविंदराव शिवदेव वगैरे सरदारांसह बुंदेलखंडांत स्वारी केली; तींतही यशवंतराव पवार होते. (भा. इतिहास सं. मंडळाचें तृतीय सम्मेलन वृत्त. पृ. ३० बोंधले घराण्याची पूर्वपीठिका.) नानासाहेब पेशवे ई. स. १७४४ चे नोव्हेंबरांत मोहिमेस निघाले. ते भेलशाची स्वारी करून पुढें बुंदेलखंडांत चालून गेले व तेथील व्यवस्था लावण्याचें काम सरदारांकडे सोंपवून तारीख १ आगष्ट १७४५ ला परत देशास गेले. बुंदेलखंडाच्या व्यवस्थेचें व बुंदेल्यांस नरम करून जम बसविण्याचें राहिलेलें काम सिंदे, होळकर, पवार वगैरे सरदार ई. स. १७४६ पर्यंत करीत होते. या स्वारींत जेतपूर सारखी बाकी जागा श्रमसाहस करून सरदारांनीं फत्ते केली; व पुढें बुंदेल्यांशीं तह होऊन जेतपूर जगतराज बुंदेल्याचे स्वाधीन करण्यांत आलें. (मध्य. वि. २ पृ. ६४) शेवटीं शेवटीं या बुंदेलखंडचे मोहिमेंत यशवंतराव पवार स्वतः हजर नव्हते. त्यांची प्रकृती नादुरस्त असल्यानें ते धारेस होते; तथापि त्यांनीं आपली सर्व फौज आगोदरच या मोहिमेवर पाठवुन दिली होती. (पारसनीस संग्रहांतील एक अप्रकाशित पत्र) या वरील हकीगती वरून ई. स. १७४४ ते १७४६ या दोन सालांतील यशवंतरावांच्या हाल चालींची साधारण कल्पना होईल.

ई. स. १७४६ डिसेंबर ते मे १७४७ पर्यंत सदाशिवराव भाऊंची कर्नाटकांत बहादुर भेंड्यावर स्वारी झाली. यशवंतराव पवारांचे या पूर्वीं पेशव्यांशीं कांहीं कारणानें थोडसें बिघडलें होतें. (पारसनीस संग्रह एक अप्रकाशित पत्र) त्यांत या वेळीं सदाशिवराव भाऊंशी अधिक बोलाचाली होऊन बेबनाव झाला. मावजी कै. पृ. ७४ मध्यें “ भाऊसाहेब हुकमी जरबेचा जाब बोलले ते फौज जमा करून

तोफांचे गोळे व बाण टाकून पेशवे यांचे डेरे जाळले " असा यशवंतरावा-विषयीं उल्लेख आहे तो प्रसंग या वेळचाच असावा. यशवंतरावांच्या या वेळच्या उद्दाम वर्तनामुळेंच पुढें त्यांचे महाल व किल्ले सन सम्मान अर्बैनांत (ई. स. १७४७) जप्त झाले होते. (बा. बा. रो. ले. १८३) ही त्यांचे महालांची जप्ती मे १७४९ त मोकळी करण्यांत आली ; (धार दरबार दफ्तर अप्रकाशित पत्र) व धारच्या किल्यावरील जप्ती ई. स. १७५१ च्या आगष्टला मोकळी झाली. यांतील पहिल्या दोन वर्षांच्या अवधींतील चार कागद हल्लीं उपलब्ध आहेत. पैकीं तीन कागद प्रकाशित झालेले आहेत. (काव्ये. सं. प. या. ले. ९२ नोव्हेंबर १७४७, राजवाडे खंड ३ ले. ४३ ता. २०-१-१७४९, बा. बा. रो. ले. ३८ ता. २३-४-१७४९) व एक धार येथील शिक्केनवीस दफ्तरांतून आम्हांस मिळाला आहे, तो अप्रकाशित आहे. या सर्वां वरून त्या वेळची यशवंतरावांची स्थिति लक्षांत येते. या वेळेस यशवंतरावांस कर्ज फार झालें होतें ; व दोन वर्षांचा सरकारी बाबतींचा ऐवजही त्यांजकडे थकला होता. एकट्या ब्रह्मेंद्र स्वामीच्या धावडशीं संस्थानाचेंच सात लक्ष रुपये कर्ज होतें. (खं. ३ ले. ४३) शिवाय नासिकच्या व दुसऱ्याही कांहीं सावकारांचे देणें होतें. अशा स्थितींत त्यांचे महाल व किल्लेही जप्त झाले असून पदरच्या फौजेचा खर्च त्यांस चालवावा लागे ; या मुळें त्यांची स्थिति फारच हलाखीची झाली होती ; व ती मुळेंच त्यांनीं निजामाकडेस संधान लावण्याचा विचार प्रदर्शित करून पुढे बासवाडा वगैरे मुलुखांत ही लूट चालविली होती. (बा. बा. रो. ले. ३८ ता. २३-४-१७४९) निजामास असा प्रबल सरदार आपल्या पक्षास येईल तर हवाच होता ; व ह्मणून त्यानें यशवंतरावांस माळवा प्रांतांत जहागीर व पंचहजारी साहेब नौबत हा किताब दिल्याचें जाहीर केलें. (राजवाडे खं. ८ ले. १७८ ता. १९-८-१७४८) या वेळीं मराठी राज्याची स्थिति फार नाजुक

झाली होती. होळकर वगैरे दुसरे सरदारही निजामास मिळूं पाहत होते. (म. रि. मध्य. वि. २ पृ. २४१) तथापि यशवंतरावांनीं प्रत्यक्षपणें असा विरोध मराठी राज्याशीं केला नाहीं. शेवटीं हें प्रकरण यशवंतरावांकडील मुत्सद्दी काशीपंत (शिक्केनवीस) यांनीं सदाशिवरावभाऊंचे दिवाण रामचंद्र बाबा (सुखठणकर) यांशीं संधान बांधून मिटविलें. (लेले दफ्तर आ. अप्रकाशित.) तेव्हां यशवंरावांस पुनः जप्त झालेले महाल व किल्ले परत मिळाले.

ई. स. १७५१ चे आरंभीं मल्हारजी होळकर व जयाप्पा शिंदे यांनीं वजीर सफदरजंग यांस साह्य करून त्याचे शत्रू अहंमदखान पठाण वगैरेंचा फरुकाबाद वगैरे ठिकाणीं मोड केला ; व पेशव्यांचें नांवानें दिल्लीचे बादशाह कडून एक फर्मान करून घेतलें. या फरमानानें मुलतान, पंजाब, राजपुताना व रोहिलखंड या सर्व मुलखांत चौथाई वसूल करण्याचा हक्क मराठ्यांस मिळाला. या महत्वाचे स्वारींत शिंदे व होळकर यांज बरावर यशवंतराव पवार व तुकोजी पवार यांज कडील प्रत्येकीं १००० या प्रमाणें फौज देण्यांत आली होती. या मदती बद्दल स्वारींत वसूल झालेल्या सुरजमल जाटा कडील खंडणीचा हिस्सा पुढें यशवंतराव व तुकोजीराव यांस मिळाला होता. (इतिहास सं. पु. ७ अंक १।२।३ स्फुट लेख नं. २ पृ. २०३)

ई. स. १७५१ च्या आगष्ट मध्यें यशवंतरावांनीं पुनः स्वारीवर जाण्याची तयारी केली. (कवठेकर राजोपाध्ये दफ्तर ले. ५५) या वेळीं ते पुण्यास होते. (कवठेकर राजोपाध्ये दफ्तर ले. २८) पुण्याहून पेशवे आक्टोबरांत गाजुद्दीनाच्या कामाकरितां मोगलाकडेस स्वारीवर निघाले; त्यावेळीं यशवंतरावांस दहाहजार फौजेनिशीं खुदावंद खानावर पाठविलें होतें. (राज. खं. १ ले २१ ता. ११-१०-१७५१) या स्वारींत घोडनदीचें युद्ध, कुकडीची लढाई वगैरे प्रकरणेंही आहेत.

शेवटीं शिंगव्याचा तह जानेवारी १७५२ ई. मध्यें झाला; (मध्य वि. पृ. ३४७) तथापि हें प्रकरण असेंच पुढें चाललें होतें. अखेरीस भालकीचा तह नोव्हेंबर १७५२ ई. त झाला तेव्हां तें मिटलें. या कारस्थानानें पेशव्यांचे निजामशाहीवर चांगलेंच वर्चस्व स्थापिलें गेलें. (मध्य वि. २ पृ. ३५७)

पुढें ई. स. १७५३ त कर्नाटकची स्वारी झाली. होळीहुन्नुर किल्यावर मोर्चे लावून तो किल्ला सर केला गेला; व नंतर धारवाड किल्लाही हस्तगत झाला. (ता. १३ मे १७५३) या स्वारींतही यशवंतराव पवार होते. ता. १८ मे १७५३ रोजीं यशवंतरावांचा मुक्काम मलप्रभा नदीवर होता. (कवठेकर राजोपाध्ये दफ्तर ले. २०)

ई. स. १७५४ त रघुनाथराव दादासाहेबांबरोबर हिंदुस्थानचे स्वारीस यशवंतराव पवार गेले होते. (भाऊसाहेबांची बखर पृ. ४) त्यांनीं कुंभरीच्या वेढ्यांत चांगली मदत केली.

या स्वारींत यशवंतराव पवारांचे धाकटे बंधु रायाजी पवार ही होते. रायाजी पवारांचा मुक्काम ई. स. १७५४ च्या जून महिन्यांत हस्तिनापूर येथें होता. (श्री भागीरथी सोरम येथील तीर्थोपाध्याय बे. रामकृष्ण बिन बेनीराम भट यांस लिहून दिलेला लेख ता. २८-६-१७५४) या वेळेस रघुनाथराव दादासाहेब ही दिल्लीसच होते. (पे. श. पृ. १३०) स्वारींत विजयी होऊन सर्व मंडळीसह ई. स. १७५५ च्या आगष्ट महिन्यांत दादासाहेब परत आले. (राजवाडे खं. ६ पृ. १२२)

रायाजी पवारांची व यशवंतरावांची सरदारी आरंभी एकत्र होती पुढें उभयतांत विरोध वाढल्यामुळें परस्परांनी आपले मध्यस्थ देऊन मौजे कलसाडा प्रगणे धार येथे दौलतीची, घराची व फौजेमुळे झालेल्या कर्जाची वाटणी ई. स. १७४४ च्या आक्टोबरांत करून घेतली. (धार

दरबार दफ्तर अप्रकाशित) त्या पुढें रायाजी पवार यांस निराळा सरदारीचा अधिकार ई. स. १७५० त मिळाला असला पाहिजे; कारण त्यांचे शिक्क्यांत संवत् १८०६ वर्ष प्रमोद दिलें आहे. असा सालाचा उल्लेख ई. स. १७४९ मधील रायाजी पवारांचे लेखावरील शिक्क्यांत नाहीं. साधनांचे अभावी रायाजी पवारांच्या ई. स. १७५० पूर्वींच्या व नंतरच्या कामगिऱ्यांविषयीं अधिक लिहितां येत नाहीं. खरे शास्त्री यांच्या ऐतिहासिक लेख संग्रहांत ई. स. १७६१ नंतर रायाजी पवार मोहिमांवर असल्याचे तीन चार दाखले आढळले आहेत. पेशव्यांचे घरांत बाळाजी बाजीरावांचे मृत्यु नंतर दोन पक्ष झाले होते, त्यावेळीं दादासाहेब व सखारामबापु यांचे हातून कारभार काढून माधवराव पेशव्यांचे नावानें कारभार चालविण्याचें माधवरावांची मातुश्री गोपिकाबाई यांनीं ठरविलें होतें, त्यांत त्यांस पाठबळ देणाऱ्या प्रमुख सरदारांत रायाजीरावही एक होते. (म. रि. मध्य वि. ४ पृ. २३) रायाजी पवार ई. स. १७६८ चे सुमारास वारल्यावर त्यांचे सरदारीचा अधिकार त्यांचे ज्येष्ठ पुत्र मल्हारराव यांस मिळाला. (महाल झाडा हिंदुस्थान सन तिसा सितेन) पुढें कांहीं विपर्यास उत्पन्न झाल्यामुळें मल्हारराव व त्यांचे धाकटे बंधु विठ्ठलराव पवार यांमध्यें दौलतीच्या वाटण्या ई. स. १७७८ त झाल्या. (लडावद दफ्तर अप्रकाशित) संभाजी पवारांनीं अजमाबाद येथील मोकद्दमी स्वहस्तें कागद करून रायाजी पवार यांस ई. स. १७४६ त दिली; तेव्हां पासून ते व त्यांचे वंशज अजमाबादकर (अमदाबादकर) पवार ह्मणविले जाऊं लागले. पेशवाई दफ्तरांतील फौज सरंजामांचे यादींतून अमदाबादकर पवार (यांची पथकें कामगिरीवर असल्याचे उल्लेख अखेर पर्यंत आढळून येतात.)

ई. स. १७५९ च्या सेप्टेंबरांत यशवंतराव पवार व समशेर बहाद्दर यांस दहाहजार फौजेनिशीं हिंदुस्थानांत रवाना केल्याचा उल्लेख

काव्यें. सं. ले. ३८६ मध्यें आहे. या वेळेस नागोरच्या वेढ्याचें काम चाललें होतें. अखेरीस बिजेसिंगास मराठ्यांशीं तह करावा लागला.

ई. स. १७५६ त बाळाजी बाजीरावांनी सावनूरची स्वारी केली. यास्वारींत यशवंतराव पवार हजर होते किंवा नाहीं, हें स्पष्ट सांगतां येत नाहीं. परंतु ई. स. १७५७ च्या फेब्रुआरींत नानासाहेब पेशवे, सदाशिवरावभाऊ वगैरे साठहजार फौजेनिशीं श्रीरंगपट्टणचे स्वारीवर निघाले; त्यांत यशवंतराव असावेत. पुढें लागलीच ई. स. १७५७ च्या आगस्टमध्यें सिंदखेडची लढाई झाली; तींत शिंद्यांचे मदतीसाठीं यशवंतरावांस पाठविण्यांत आलें होतें. (मध्य वि. २ पृ. ३८७) या लढाईत यशवंतराव पवारांनीं निजामास अडवून धरिलें होतें. निजामास खिंडींत अडवून धरून मुलखाच्या सोडचिठ्या त्याजपासून यशवंतराव पवारांनीं घेतल्याची एक आख्यायिका आह्मांस लेले दफ्तरांतून मिळाली आहे; ती याच प्रसंगाची असली पाहिजे. थर्मापिलीच्या खिंडींत मुठभर ग्रीक लोकांनीं प्रचंड इराणी फौजेस अडवून धरिलें होतें, या ग्रीसच्या इतिहासांतील गोष्टीचें या ठिकाणीं स्मरण होतें. या स्वारींत व यानंतर ई. स. १७६० पर्यंत निजामाशीं जीं प्रकरणें चालली होतीं त्या सर्वांत यशवंतराव हजर होते.

ई. स. १७६० त उदगीरची लढाई झाली; तींत मोंगलाकडील चंडोल * यशवंतराव पवारांनी बुडविला. यावेळीं यशवंतरावांनीं मोठ्या पराक्रमानें कवठ्याचे रानांत मोंगलाचे चंडोलाचा अगदीं मोड केला, (फडके. पर ई. पृ. ९६) व फत्ते मिळविली असें सांगतात कीं, कवठ्याजवळ घोडनदीचे कांठीं फत्तेश्वर महादेवाचें देवालय यशवंतरावांनीं बांधिलेलें आहे, तें याच गोष्टीचें स्मारक आहे.

* चंडोल ह्मणजे सैन्याची पिछाडी. (The rear of an army)

या स्वारींत व श्रीरंगपट्टण वगैरे कडील स्वाऱ्यांत यशवंतरावानीं पुष्कळ लूट मिळवून आणिली व ती सर्व पेशव्यांस अर्पण केली. तींतून पेशव्यांनीं एक राजराजेश्वराची मूर्ति व चौघडा यशवंतरावांस दिला. ही लुटींत मिळविलेली राजराजेश्वराची सुंदर मूर्ति धार येथील राज घराण्यांतील देवालयांत तेव्हांपासून कुलस्वामी म्हणून पूजिली जात असून संस्थानांतील राजवाड्यावर चौघडाही त्याच वेळेपासून आहे. या चौघड्याचे पितळी नौबदीवर कानडी लिपींत व भाषेंत उत्कीर्ण लेख व कांहीं चिन्हें आहेत. यशवंतरावांचे या कर्नाटकांतील विजयापासूनच जरीपटका व आणखी पंचवीसशें स्वारांचे पथकही त्यांस देण्यांत आलें.

अशा रीतीनें यशवंतरावांनीं निरनिराळ्या मोहिमांत पराक्रम गाजवून शेवटीं ई. स. १७६१ तल्या पानिपत येथील महा रणयज्ञांत मराठी साम्राज्यासाठीं आपल्या प्राणाची आहुती देऊन आपली तेजस्वी कारकीर्द संपविली.

असा हा यशवंतराव पवारांच्या ई. स. १७३४ पासून १७६१ पर्यंतच्या हालचालींचा अगदीं थोडक्यांत वृत्तान्त आहे. या २७ वर्षांच्या काळांत यशवंतरावांनीं अत्यंत महत्वाच्या कामागिऱ्या बजाविल्या आहेत. इतकेंच नव्हें तर त्यांनीं आपल्या कारकीर्दींत एका वर्षाचा देखलि खंड पडूं न देतां कधीं उत्तरेस तर कधीं दक्षिणेंस याप्रमाणें एक सारख्या मोहिमांवर मोहिमा करून मराठी साम्राज्याचे विस्तारासाठा जे अविश्रान्त परिश्रम केले ते खरोखरच त्यांचे सारख्या वीरास अत्यंत भूषणावह असून त्यांचे वंशजांस अभिमानास्पद आहेत, यांत कांहीं शंका नाहीं. असो; या हकीगतीवरून यशवंतरावांच्या पराक्रमाची व कर्तबगारीची कल्पना येऊन मराठेशाहींत, निजामशाहींत व दिल्लीचे पादशाहींत त्यांचें कसें वजन होतें हें ही चांगलें लक्षांत येईल. यशवंतराव हे मोठे शूर असून साहसी व बेफिकरी स्वभावाचे होते. लढाईवर जाण्याची अगदीं तयारी

असतांही ते एके प्रसंगीं चौपट खेळण्यांत अगदीं दंग होते, अशी त्यांबद्दल एक आख्यायिका आहे. तीवरून त्यांच्या बेपर्वा स्वभावाची कल्पना होईल. याप्रमाणेंच ते मोठे मानी व दयाळू अंतःकरणाचेही होते. आपल्या पदरच्या लोकांस दुसऱ्याकडून उपसर्ग झालेला त्यांस अगदीं सहन होत नसे. या त्यांच्या स्वभावासंबंधाची एक आख्यायिका मालकम साहेबांनीं आपल्या पुस्तकांत दिली आहे. (Malcolm Page 83 Foot Note) त्या गोष्टीवरून यशवंतरावांची चाल चलणूक व बाणेदारपणा हीं चांगलीं व्यक्त होतात. यशवंतरावांसंबंधाच्या निरनिराळ्या प्रसंगाच्या दोन तीन आख्यायिका आमचेपाशीं ही आहेत, परंतु त्या देण्याचें हें स्थल नव्हे. मध्यंतरीं त्यांच्या तापट स्वभावामुळें यशवंतरावांकडून सदाशिवराव भाऊंशीं जें उद्दामपणाचें वर्तन झालें तेवढाच काय तो त्यांचे चरित्रांत दोष दिसून येतो. तथापि ऐन उमेदीचे काळांत मनासारखी गोष्ट न झाल्यास अंगांत चांगली धमक असलेल्या पुरुषाकडून क्वचित् प्रसंगीं अननुभवी वरिष्ठांचा उपमर्द सहज घडून जातो; तेव्हां ही जी त्यांचे हातून चूक घडली तिजबद्दल त्यांस सर्वस्वी दोषी ठरविणें योग्य होणार नाहीं. इतकेंच नव्हे; तर यांत ही एक विशेष गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे; ती हीं कीं, यशवंतरावाचें आरंभीं थोडें पेशव्यांशीं बिनसलें होतें व पुढें सदाशिवरावभाऊंशींही विरुद्ध आलें, तथापि समेट झाल्यावर शेवट पर्यंत यशवंतरावांनीं आपल्या वरिष्ठांशीं फार प्रामाणिक पणाचें व अत्यंत प्रेमाचें वर्तन ठेविलें; व अखेरीस सदाशिवरावभाऊ बरोबर राहूनच त्यांनीं राष्ट्रकार्यासाठीं आपला देह खर्ची घातला. यावरून यशवंतरावांच्या उच्च प्रतीच्या स्वभावाची कल्पना करितां येण्यासारखी आहे.

असो; आतां यशवंतरावांनंतर मराठी साम्राज्याच्यावतीनें धार येथील राज्यकर्त्यांकडून कसकशा कामगिऱ्या झाल्या हें पाहूं.

यशवंतरावांचे मागें त्यांचे पुत्र खंडेराव हे अलपवयी होते.

यशवंतराव पवार पानीपतचे युद्धांत " गायब " झाले असा समज असल्यानें धारकर पवारांचे पथकास कांहीं काल पर्यंत यशवंतरावांचेंच नांव चालत होतें. ई. स. १७६१ च्या आक्टोबर महिन्यांत मोंगलाशीं (निजामाशीं) लढाई देण्यासाठीं ज्या फौजा जमा झाल्या, त्यांत यशवंतराव पवारांच्या पथकांपैकीं एक हजार व रायाजी पवारांकडील सोळाशें या प्रमाणें फौज होती. (ऐ. ले. सं. भाग २. ले. ४३) या लढाईंत मोगल अगदीं हैराण व गार झाला. ही मोहीम ता. ८ जानेवारी १७६२ पर्यंत चालली होती. (मध्य. वि. ४ पृ. ६)

पानीपतानंतर उत्तरप्रांतीं मराठ्यांचे ताब्यांतील मुलूख पुनः काबीज करून घेण्याचे प्रयत्न रोहिले, पठाण, जाट वगैरेंनीं चालविले असून यमुनेअलीकडे बुंदेल खंडांत ठिकठिकाणचे रजपूत राजे मराठ्यांचा ताबा झुगारून देण्यासाठीं जोर करूं लागले होते ; त्यावेळीं बाळाजी गोविंद बुंदेले (खेर) यांची कुमक करण्यासाठीं श्रीमंतांचे आज्ञेवरून नारोशंकर (राजेबहाद्दर) फौजा घेऊन निघाले होते ; त्यांज बरोबर विठ्ठल शिवदेव अंताजी माणकेश्वर व यशवंतराव पवार यांची पथकें होती. (काव्ये. सं. पत्रें यादी. ले. १०१ ता. २६-२-१७६२ *)

ई. स. १७६३ सालांतील मोहिमेंत पवारांचे (धारकरांचे) पथक कामगिरीवर असल्याचा दाखला आढळतो. (ऐ. ले. सं. भाग १. ले. २२२ ता. ४-४-१७६३)

* या पत्रावर साल दिलेलें नाहीं रा. वि. का. राजवाडे यांनीं या पत्राची तारीख २ जानेवारी १७६७ ई. असावी असें खंड १ प्रस्तावना पृ. ११९ मध्यें दाखविलें आहे, परंतु सदर पत्रांत सुभेदार (मल्हारजी होळकर) चांदवडास आल्याचा उल्लेख आहे. मल्हारराव होळकर ई. स. १७६३ त चांदवडास होते; तेव्हां वरील पत्र ई. स. १७६३ पूर्वीचें आहे, हें स्पष्ट आहे ; व याच संदर्भानें वरील तारीख लाविली आहे.

खमस सितेन मया व अल्लफ (ई. स. १७६४-६५) सालांत कर्नाटकचे स्वारींत धारकर पवारांचे पथक होतें. या स्वारींत पेशवे माधवराव हे स्वत: हजर असून यावेळीं सावनूर, धारवाड, अनवडी वगैरे ठिकाणीं मोठाले संग्राम झाले; व तुंगभद्रेपर्यंत मुलूख काबीज झाला. (मध्य वि. ४ पृ. ६६) या स्वारींत गेलेल्या खंडेराव पवारांचे पथकाची खडी गणती मुक्काम गगलनाथ तुंगभद्रातीर येथें ता. १३ एप्रील १७६५ रोजीं झाल्याचा दाखला उपलब्ध आहे. (इ. सं. पु. ७-८ पृ. ९२)

ई. स. १७६५-६६ त मोठी मोहीम झाली नाहीं. (मध्य वि. ४ पृ. ७७) ई. स १७६६-६७ सालांत जी कर्नाटक ची मोहीम झाली, तींत धारकर पवारांचे पथक गेलें असावें; परंतु त्या विषयीं दाखला उपलब्ध झाला नाहीं.

पुढें रोहिलखंडांत फतरगडावर स्वारी झाली. या स्वारीकरितां खंडेराव पवार यांजला सरंजामासुद्धां पुणें मुक्कामीं यावें ह्मणोन बोलावणें आलें. बोलावण्या प्रमाणें यशवंतराव पवार यांची ज्येष्ठ स्त्री व खंडेराव पवार यांची सापत्न मातुश्री सकवारबाई यांनी खंडेराव यांची तयारी केली, परंतु खंडेरावांची मातुश्री गहिनाबाई यांनी त्यांस पाठविण्याचें नाकारलें. दिवाण शिवराव ओढेकर, शिक्केनवीस वगैरेंनीं बहुत प्रकारें समजाविलें; परंतु न ऐकिले. श्रीमंतांनी पुण्याहून मुद्दाम रणदिवे यांस पाठविले; तरीही गहिनाबाई यांनी खंडेरावांस पाठविलें नाहीं. तेव्हां सकवारबाई यांच्या विचारा येईल तसें करावें, ह्मणोन पुण्याहून निरोप आल्यावरून यशवंतरावांचे दासीपुत्र महिपतराव पवार यांची स्वारीवर जाण्यासाठीं तयारी करण्यांत आली. महिपतराव व शिवराव आबा (ओढेकर) दिवाण सरंजामासह पुण्यास गेले; व पुढें महिपतराव सरंजामासुद्धां हिंदुस्थानचे स्वारीवर विसाजीपंत बनीवाले यांज बराबर रवाना झाले.

तिकडे ते सहा वर्षेपर्यंत होते. ठिकठिकाणीं विजय मिळवीत अखेरीस फत्तरगड * फत्ते झाल्यावर कांहीं दिवसांनीं ते परत आले. या स्वारींत महिपतरावांचे हातांखालीं पवारांचे फौजेनें चांगले पराक्रम केले. (शिक्केनवीस दफ्तर यादी नं. १) × ही स्वारी मराठ्यांचे इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. पानीपतयुद्धप्रसंगीं ज्यांनी बदनियत केली होती त्यांचे पारिपत्य या प्रसंगीं होऊन रोहिलखंड मराठ्यांचे हस्तगत झाले; व दिल्लीपर्यंत मराठ्यांची सत्ता दृढ झाली. पानीपतावरून नेलेली मराठ्यांची अपार संपत्ति येथें होती, ती सर्व मराठ्यांस मिळून पानीपतप्रसंगी कैद झालेल्या कांहीं मराठी बायका येथें होत्या त्यांची

---

* फत्तरगड यास नजीबगड असें दुसरें नाव आहे. हा किल्ला नजीबउद्दवला यानें ई. स. १७५५ त बांधिला. नजीबउद्दवल्याची राजधानी नजीबाबाद येथून हा किल्ला पूर्वेस दीड मैलावर आहे. (Bijnor Gazetteer pare 277)

× वरील शिक्केनवीस दफ्तरांतील यादीवरून यावेळीं खंडेराव पवार स्वारीवर जाण्या सारखे वयांत आलेले असावेत असें दिसतें. मालकम साहेबांनीं यशवंतराव पवार पानीपतांत नाहींसे झाले, त्यावेळीं त्यांचे पुत्र खंडेराव हे अडीच वर्षांचे होते, असें लिहिले आहे; त्यावरून या स्वारीचे वेळीं (ई. स. १७६८-६९ त) खंडेरावांचे वय दहा साडेदहा वर्षांचे असावें, परंतु इतक्या लहान वयांत स्वारीवर पाठविण्याची तयारी राज्यांतील मुत्सद्यांनीं व राणी सकवारबांईनीं करणें व पेशव्यां कडून ही स्वारीवर पाठविण्याविषयीं आग्रहानें निरोप येणें संभवत नाहीं; तेव्हां या स्वारीचे वेळीं खंडेराव पवारांचें वय निदान १४-१५ वर्षांचें तरी असावें असें अनुमान होतें. खंडेराव पवारांची जन्मपात्रिका कोठें उपलब्ध झाल्यास याविषयीं संशय राहणार नाहीं.

ही यावेळीं सुटका झाली. (मध्य. वि. ४ पृ. २२४)

पेशवाई दफ्तरांतील सुहुरसन सल्लास सैबन (ई. स. १७७२-७३) सालाच्या फौज सरंजामाचे ताळेबंदांतही खंडेराव पवारांचे पथकाची नेमणूक दर्ज आहे.

यशवंतराव पवारांनंतर दौलतीची व्यवस्था, खंडेराव पवार हे अल्पवयी असल्यामुळें, राणी सकवारबाई व दिवाण ओढेकर यांनीं पेशव्यांचे अनुमतीनें चालविली होती. फत्तरगडचे स्वारीवर महिपत-रावांस पाठविण्यांत आलें, खंडेरावांस पाठविण्या विषयीं आग्रहानें सांगण्यांत आलें असूनही त्यांचे मातुश्रींनीं त्यांस पाठविलें नाहीं; (शिक्केनविस दफ्तर यादी नं. १) याचा परिणाम चांगला झाला नाहीं. महिपतरावांस स्वारीवर जाण्याचा मोका मिळून तेथें त्यांचे पराक्रम निदर्शनास आल्यामुळें साहजीकच खंडेरावांस वाटलें कीं, आतां महिपत-रावावर पेशवाईंतील प्रमुख व कर्त्या पुरुषांची अधिक कृपा राहील. व त्यांचा उत्कर्ष होऊन आपणास मागें राहण्याचा प्रसंग येईल; तेव्हां असें नव्हावें म्हणून, खंडेरावांनीं कोणातरी वजनदार व कर्त्या पुरुषाच्या आश्रयानें राहण्याचें ठरविलें. पेशवाईंत यावेळीं दुफळी झालेली होती. पेशवे माधवराव व रघुनाथराव दादासाहेब यांचे भांडणांत सरदारांची त्रेधा उडत असे. कोणता पक्ष स्वीकारावा हें कळणें फार कठिण होतें. कांहीं सरदार मंडळींनीं रघुनाथरावांचा पक्ष स्वीकारला होता. त्या प्रमाणें खंडेरावांनीं ही दादासाहेबांचे पक्षांत सामील होऊन त्यांजवळ कारभारी या नात्यानें राहिले. (शिक्केनवीस दफ्तर यादी नं. १) परंतु दुर्दैवानें पुढें पारडें अगदींच फिरलें. थोरले माधवराव साहेब ई. स. १७७२ चे नोव्हेंबरांत दिवंगत झाल्यावर भाऊबंदकीस अधिकच जोर चढला, व त्याचें पर्यवसान नारायणराव पेशवे यांचे वधांत झालें तेव्हां रघुनाथराव दादांचा पक्ष अगदीं वेगळा व दुर्बल झाला. यावेळीं

तरी खंडेरावांनी नीट विचार करून, दौलतींतील मुत्सद्यांचे विचारानें सत्पक्षास मिळावयास हवें होतें; परंतु अल्पवय व अनुभव कमी यामुळें तसें त्यांचे हांतून झालें नाहीं. त्यांनी दादासाहेबांची पत्नी आनंदीबाई या गरोदर असल्यामुळें त्यांस धारचे किल्यांत आश्रयदिला. तेव्हां पेशवाईतील कारभारी मंडळ त्यांजवर अधिकच रुष्ट झालें; व त्यामुळें त्यांचे महाल व किल्लेही जप्त करण्यांत आले. आनंदीबाई ई. स. १७७४ ते १७७९ पर्यंत सुमारें पांच वर्षें धारचे किल्यांत होत्या. तेथें त्यांस ता. १० जानेवारी १७७५ रोजीं पुत्र झाला, तेच शेवटचे पेशवे बाजीराव होत. पुढें खंडेराव पवारांनीं दादासाहेबांचा पक्ष सोडून दिला, व ते पुण्यास गेले; तेव्हां त्यांचे महाल वगैरे त्यांस ई. स. १७७६ च्या आगस्टांत परत देण्यांत आले. (स. मा. पे. रो. ले. १३३) धारचा किल्ला विरुद्ध पक्षाचे कबजांत गेला होता, तो आपले ताब्यांत घेण्याची खटपट पुणें येथील कारभारी मंडळ करीत होते. (स. म. पे. रो. ले. ११ व १३)

मध्यंतरी धार येथील दौलतीचा कारभार पेशव्यांचे वतीनें ओढेकर दिवाण पाहत होते, त्यावेळींही धारकर पवारांची पथकें कामगिऱ्यांवर जात होती.

सुहुर सन सित सबैन (ई. स. १७७५-७६) सालच्या पेशवाई दफ्तरांतील ताळेबंदांत खंडेराव पवारांचे फौज सरंजामाची नेमणूक दर्ज असून (ई. स. पु. ७-८ पृ. १०) ई. स. १७७७ च्या एप्रील महिन्यांत धारच्या पवारांचें पथक अमदाबादेकडे कामगिरीवर पाठविले जाण्याबद्दलचा उल्लेख काव्येतिहाससंग्रह पत्रें यादी ले. १२६ ता. २२-४-१७७७ मध्यें आला आहे.

ई. स. १७७९ च्या डिसेंबरांत खंडेराव पवार महादजी शिंद्यां

जवळ होते. तेथें त्यांनीं कांहीं कागद पत्रें मागविली होती. (शिंके-नर्वास दफ्तर अप्रकाशित पत्र) पुढें पवारांचे पथक महादजी शिंदे व शिवाजी विठ्ठल यांज बराबर कामावर होतें. (महेश्वर दरबारची बातमी पत्रें. ले. ४ ता. २८ मार्च १७८०)

पेशवाई दफ्तरांतील इहिदे समानीन (ई. स. १७८०-८१) सालच्या फौजसरंजामाचे ताळेबंदांत खंडेराव पवारांच्या पथकाची नेमणूक दर्ज आहे. (इ. सं. पु. ७ व ८)

ई. स. १७८१ च्या आरंभी खंडेराव पवार स्वतः महादजी शिंद्यांकडे गेले होते. (काव्ये. सं. प. व या. ले. २७७) यावेळीं कर्नल कॅमॅक् हे शिंद्यांचे मुलुखावर स्वारी करून सिरोंज पर्यंत चालून आले होते. तेथें महादजी बाबांनी इंग्रजांचे फौजे भोंवतीं घिरट्या घालून तीस दाणा, वैरण मिळूं दिली नाहीं, यामुळें इंग्रजी फौज बेजार झाली ; तेव्हां कर्नल म्यूर कॅमॅक्च्या मदतीस आले. दोघांनीं पावसाळ्यांत शिंद्यांचे मुलुखांतच छावणी दिली. महादजी शिंद्यांनीं सैन्यांतील सरदारांच्या हाताखालीं स्वारांच्या लहान - लहान टोळ्या करून इंग्रजी फौजे भोंवतीं पसरून दिल्या व त्यांस त्रासवून सोडिलें ; तेव्हां शेवटीं पावसाळ्यांत कर्नल म्यूर व महादजी शिंदे यां-मध्यें तह झाला. या कारस्थानांत पवार (खंडेराव) आपल्या पथ-कासह महादजी शिंद्यांस सामील झाले होते. (काव्ये. सं. प. व या. ले. २८६ ता. १५-३-१७८१)

पेशवाई दफ्तरांतील इसन्ने समानीन (ई. स. १७८१-८२) च्या फौज सरंजामाचे ताळेबंदांतही खंडेराव पवारांचे पथकाची नेमणूक लागू आहे.

ई. स. १७८२ च्या फेब्रुआरी महिन्यांत खंडेराव पवार स्वर्गवासी झाले. * यावेळीं खंडेरावांचे पुत्र आनंदराव हे गर्भांतच होते. ते पुढें नोव्हेंबर महिन्यांत जन्मले. × पुढें पांच सहा महिन्यानंतर त्यांचे नांवें सरदारी कायम झाली. आनंदराव अल्पवयी असतां दौलतीची दरोबस्त व्यवस्था रंगराव ओढेकर दिवाण पाहत होते.

खमस समानीन मया व अलफ सालच्या एका पत्रांत (खांडेकर दफ्तर ले. ३ ता. २२ एप्रील १७८५ ई.) कोल्याहून स्वारी येतानां फौज खर्चा बद्दल रु. ५१०० ची वरात केल्याचा उल्लेख आहे ; तेव्हां धारकर पवारांचे पथक ई. स. १७८५ पूर्वी कोल्याकडे स्वारीवर ओढेकरांकडूनच पाठविलें गेलें असलें पाहिजे, हें उघड आहे.

ई. स. १७८६-८७ त कर्नाटकांत जी टिपूवर मोहीम झाली

---

* मालकम साहेबांनीं खंडेराव पवारांच्या मृत्यूचें साल स्पष्ट दिलें नाहीं, तथापि त्यांचे लिहिण्यावरून खंडेराव पवारांचा मृत्यु ई. स. १७८० त झाला असावा असें त्यांचें मत होतें असें दिसतें ; व तेंच पुढें मॅलिसन प्रभृतींनीं ग्राह्य मानिलें आहें. ई. स. १७८१ चे आरंभीं स्वत : खंडेराव पवार महादजी शिंद्यांकडे गेल्याचे वर दाखविलें आहे ; तेव्हां मॉलिसन प्रभृतींनीं दिलेलें साल बरोबर नाहीं हें लक्षांत येईल. दुसरें इसन्ने समानीन (ई. स. १७८१-८२) सालच्या ताळेबंदांत (शिक्केनवीस दफ्तर अप्रकाशित) रबिलावल (फाल्गुन) महिन्यांत खंडेराव पवारांचे उत्तर कार्या बद्दल खर्च पडला आहे ; त्यावरून खंडेराव पवार ई. स. १७८२ च्या फेब्रुआरी महिन्यांत मरण पावले हें उघड आहे

× राज्यभूषण पं. मुकुन्दजोशी, धार यांचे येथील जन्मपत्रिके वरून.

तींत धारकर पवारांचे पथक हरिपंत फडके यांज बरावर गेलें होतें. (धार दरबार दफ्तर अप्रकाशित) हरिपंत फडके, तुकोजी होळकर वगैरे सरदार जंगी फौज घेऊन पुण्याहून निघाले. त्यांस यादगीर येथें मुधोजी भोसले व निजाम अल्लीही येऊन सामील झाले. सर्वांनीं टिपूचे राज्यावर हल्ला चढविला. बादामी, बहादुरभेंडा व गजेन्द्रगड हे किल्ले सर करून पुढें हरिपंतांनीं शिरहट्टी घेतली. शेवटीं टिपूनें तह केला त्यांत मागील खंडणी बद्दल ४९ लक्ष रुपये कबूल करून त्यापैकीं तीस लक्ष रुपये रोख दिले व कित्तुर, बादामी व नरगुंद हे प्रांत मराठ्यांस दिले. (मु. म. पृ. ३९९)

या नंतर अलीबहादर हिंदुस्थानांत महादजी शिंद्यांचे मदतीस गेले होते. त्यांज बराबर असलेलीं पवार, (धारकर) जाधव, ओढेकर वगैरें चीं पथकें त्यांनीं सदाशिव शामराज याजकडे गोवर्धनानजीक पाठविली होती. (अलीबहादर पत्र व्य. ले. ६८ ता. ९-१०-१७८९) हीमथुरेची मोहीम सुमारें चार साडेचार वर्षे (ई. स. १७८८ ते ९२ पर्यंत) चालली. (हो. ई. सा. पृ. १८)

ई. स. १७९३ त अलीबहादराबराबर आनंदराव पवारांचे सातशें स्वारांचे पथक कामगिरीवर होतें. (पेशवे दफ्तरांतील कागद पत्र. इ. सं पु. ७-८)

ई. स. १७९५ त खर्ड्याचे लढाईत धारकर पवार होते; असाउल्लेख पेशव्यांचे बखरींत आहे. (पृ. १८२) * यावेळीं आनंदराव पवार हे बडोद्यास आपले आजोळीं होते व धार येथील राज्य कारभार ओढेकर दिवाणांचे वतीनें चालला होता; तेव्हां ओढेकर दिवा-

---

* या बखरींत धारकरांशिवाय नगरदेवळेकर, मलठणकर, अमदाबादकर व सुपेकर पवारही खर्ड्याचे स्वारींत होते, असें म्हटलें आहे.

णांनींच धारकर पवारांचे तर्फें पथक पाठविलें असावें.

ई. स. १७९८ त धारकर पवारांचे पथक चाकरी वरोन उठोन गेलें, म्हणून अलीबहाद्दरानें तक्रार केली आहे. (राजवाडे खं. ६ ले. ४४१ ता. २३ जून १७९८)

या वेळीं धारच्या दौलतीचे दिवाण रंगराव ओढेकर हे मालकाशीं फितुर झाले होते; तेव्हां स्वत: आनंदरावांस बडोद्याहून येऊन दौलतीचा बंदोबस्त करावा लागला. आनंदरावांनीं प्रथम झाबव्यास येऊन तेथें हजार बाराशें सरंजाम जमविला, (शिक्केनवीस दफ्तर यादी नं. २) व बदनावरास येऊन परगण्यांतील ठाकूर लोकांस अनुकूळ करून घेतलें; आणि ओढेकरांचा मोड करून दौलत ताब्यांत घेतली.

यासमयीं आनंदराव अशा अडचणींत असून त्यांचे पथक केवळ ओढेकर दिवाणांच्या गैर व्यवस्थेमुळें उठून आलें होतें. त्याबद्दल आनंदरावांनीं अलीबहाद्दरास पत्र लिहिलें त्यांत त्यावेळच्या येथील व पुण्यांतील राजकीय परिस्थितीचें प्रतिबिंब असल्यामुळें तें समग्र येथें दिलें आहे.

रा. अलीबहादर बाबा

गोसावी यांसीं.

छ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो० आनंराव पवार राम राम विनंति. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष. बहुत दिवस जाले पत्र येऊन परामर्श होत नाहीं असें नसावें. निरंतर पत्र पाठवून तोषवीत असावें. यानंतर इकडील पथक आपल्या जवळ होतें तें वोढेकरांनीं खर्चाची वोढ पाडिल्यामुळें उठोन आलें. त्याचे ताकिदीस आपण पत्र देऊन काशीबा वगैरे दोघे

हुजरे पाठविले, त्यास सरकारचाकरी कोठेंही करावी परंतु वोढे करांनीं आम्ही येथें आल्या दिवसा पासून आम्हासी निरंतर कंबद (र) बांधून मनस्वी बखेडे करून दौलत खराबींत आणिली, त्याचा तपसील पत्रीं कोठवर लिहावा. सरकारांतून बंदोबस्त होण्या विशीं बहुतवेळ विनंति लिहिली. तथापि तेथें गडबड आणि वोढे-करांचे गैरवाका समजावणें या मुळें कांहींएक ध्यानांत आणिलें नाहीं आणि दोन हुजरे पुण्याहून बोलावण्याकरितां येऊन बसले आहेत. याचा विचार पाहातां तिकडे गेलें पाहिजे, तेव्हां आपलें कडील हुजरे यांस व्यर्थ न ठेवावें आपल्याकडे रवाना करावें हें ठीक जाणून हर दू जणांस मार्गस्थ केलें आहे, सविस्तर निवेदन करतील. वडिलांपासून सरकार चाकरी करीत आलों हें ध्यानांत ठेऊन सर्वदा पत्र पाठवून सांभाळ करीत जावा रा छ. २६ मोहरम बहुतकाय लिहिणें लोभकरावा हे विनंति.

(धार स्टेट पॅलेस रेकार्डस्)

हें पत्र ता० ११ जुलै १७९८ ई. चें असून त्यांत लिहिल्या-प्रमाणें आनंदराव पुढें पुण्यास गेले असावेत.

ई. स. १७९९ त होळकरांनीं बढवाणी संस्थानांतील कांहीं भाग दाबून उपद्रव दिला होता, त्यासाठीं संस्थानचे बंदोबस्तास दुर्गादास भवानी याजबराबर स्वार गाडदी वगैरे पुण्याहून पाठविण्यांत आले होते, त्यावेळीं आनंदराव पवारांस बढवाणी संस्थानाविषयीं हरएक प्रकारें साहित्य करण्याविषयीं पुण्याहून पेशव्यांकडून या सालचे नोव्हेंबरांत लिहून आलें होते. (पे. द. मा. ई. सं. पु. ७-८ क. १९)

पेशव्यांचे दप्तरांतील इहिदे मयानेत व अलफ (ई. स. १८०० -१८०१) सालच्या सरंजामी सरदारांचे यादीत पवारांचे सरंजामाची नोंद आहे, तींत नावांचा तपशील दिला नाहीं; तथापि दुसऱ्या यादींचे

संदर्भावरून त्यांत आनंदराव पवारांचा सरंजाम दर्ज आहे याबद्दल शंका राहत नाहीं. (पे. द. मा. इ. सं. पु. ७-८)

इ. स. १८०२ मध्यें बाजीराव पेशवे वसईयेथें इंग्लिशांशीं तह करून परतंत्र बनले; ही गोष्ट त्यावेळचे मराठशाहींतले प्रमुख सरदार शिंदे व भोसले यांस आवडली नाहीं. तेव्हां त्यांची व इंग्रजांची लढाई सुरू झाली. यावेळी आनंदराव पवारांस दौलतराव शिंद्यांचे मदतीसाठीं जावें लागलें इंग्रजांचे आणि शिंदे व भोसले यांचे आसई गांवाजवळ युद्ध झालें, त्यांत शिंद्यांस यश मिळालें नाहीं. (मु. म. पृ. ४३९ आणि धार स्टेट ग्याझेटीयर पृ. १०) या युद्धानंतर आनंदराव शिंद्यांचे फौजेंतून निरोप घेऊन मांडव गडास ता. ९ आक्टोबर १८०३ ई. रोजीं परत आले. (बडोदेंयेथील फणसे दप्तर ले. ११)

पुढे आनंदराव पवार ई. स. १८०७ च्या जून महिन्यांत निवर्तले, तथापि त्यानंतर ही धारकर पवारांचे पथकास आनंदराव पवारांचेच नांव चालत होतें, असें दिसतें. पेशवाई दफ्तरांतील खमस अशर मयातेन व अलफ (ई. स. १८१४-१९) सालच्या फौज सरंजामाच्या यादींत आनंदराव पवारांच्या सातशें स्वारांच्या पथकाचा निर्देश आहे.

यशवंतराव पवारां नंतर खंडेरावांचे वेळीं धारचे राज्यास संकटाचे दिवस येत गेले, आणि आनंदरावांचें कारकिर्दीत दिवाणाचे फितुरीमुळें व पुढें गृहकलहामुळें त्यांत दिवसें दिवस अधिकच भरपडत गेली, तथापि अशा स्थितींतही वेळोवेळीं धारकर पवारांनीं शक्यतेप्रमाणें मराठी साम्राज्याची कामगिरी बजावण्यांत अखेरपर्यंत कसर केली नाहीं हें, यावरून लक्षांत येईल.

या घराण्याचे मूळ पुरूष साबाजी उर्फ शिवाजी पवार यांचा

उदय ई. स. १६४०-४२ चे सुमारास झाला, तेव्हां पासून ई. स. १८१९ पर्यंत म्हणजे सुमारें पावणेदोनशें वर्षें या घराण्यांतील पुरुषांनीं मराठी साम्राज्याची कसकशी कामगिरी बजाविली, हें वर शक्य तितकें साधार दाखविलें; आतां या काळांत मराठी साम्राज्यासाठीं युद्धांत प्राण वेंचलेल्या पवार घराण्यांतील राष्ट्रभक्त व स्वामिनिष्ठ वीरपुरुषांची यादी देऊं.

१. **बुबाजी पवार** – कृष्णाजी पवारांचे पुत्र खानदेशांत मोगलांचे हांतून युद्धांत मारले गेले. (मावजी कैफियत)

२. **दारकोजी पवार** – उदाजीरावांचे जेष्ठ पुत्र. लढाईत गत झाले. (मावजी कै.)

३. **मैनाजी पवार** – उदाजीरावांचे दुसरे पुत्र. ई. स. १७३९ त मिरजेचे लढाईत पडले. (राजवाडे खं. ६ पुरंधरे स्मरणवही पृ. २३)

४. **गोविंदराव पवार** – उदाजीरावांचे तिसरे पुत्र. लढाईत मृत्यु पावले. (मावजी कै.)

५. **चंद्रराव पवार** – उदाजीरावांचे चौथे पुत्र. बारभाईंचे गर्दींत शस्त्रें करून मृत्यु. (मावजी कै.)

६. **गोविंदराव पवार**
७. **दारकोजीराव पवार** } जगदेवराव यांचे पुत्र. पंढरपुरचे व आनंदमोगरचे लढाईत मृत्यु पावले. (मावजी कै.)

८. **यशवंतराव पवार** – आनंदरावांचे पुत्र. यांनी पानीपतचे प्रासिद्ध रणसंग्रामांत आपला देह अर्पिला.

याप्रमाणें या घराण्यांतील आठ पुरुषांनीं साम्राज्यासाठीं आपले देह धारा तीर्थी अर्पण करून आपल्या आंगचें क्षात्रतेज व्यक्त केलें. या शिवाय या घराण्याचे मूळपुरूष **साबाजी** उर्फ **शिवाजी पवार** यांचे हातास लढाईंत जबर जखम लागली होती व **उदाजीराव, आनंदराव** आणि **जगदेवराव** हे त्रिवर्ग बंधूही युद्धांत आलेल्या अनेक जखमांची क्षात्रियांस उचित अशी भूषण चिन्हें आपल्या सर्वांगावर वागवीत होते. (चितेगांवकर कैफियत)

(वरील पुरुषांचा स्पष्ट बोध होण्यासाठीं सोबत पवार घराण्याची संक्षिप्त वंशावळी देऊन तींत या पुरुषांची नांवें अधोरेखांकित केली आहेत.)

येथपर्यंत या घराण्यांतील पुरुषांनीं साम्राज्यासाठीं बजावलेल्या कामगिऱ्यांचा करतां आला तितका सालवार निर्देश केला ; आतां साम्राज्याचे घटक या नात्यानें मराठी साम्राज्यांत या घराण्यांतील पुरुषांचा दर्जा कशा प्रकारचा होता हें ही येथें थोडक्यांत दाखविलें पाहिजे. *

छत्रपती शिवाजी महाराजांचे वेळीं कृष्णाजी व त्यांचे पुत्र बुबाजी व केरोजी यांची नामांकित सरदारांत गणना केली जात होती. छत्रपती राजाराम महाराजांचे वेळीं बुबाजी रायाजी व केरोजी या त्रिवर्ग बंधूंनीं मोठमोठी विश्वासाचीं व पराक्रमाचा अनेक कामें करून " विश्वासराव " " सेना बाराहजारी " वगैरे सन्माननीय पदव्या व विश्वासराईचा मोठा सरंजाम मिळविला. याच वेळीं बुबाजींचे पुत्र

---

* खास धार दरबारचे दफ्तरांतील कागद पत्रां वरून " मराठी साम्राज्यांत पवारांचे महत्व व दर्जा " या विषयावर दुसरा एक विस्तृत लेख तयार झाला आहे ; तोही यानंतर अल्पावकाशांतच प्रसिद्ध होईल.

संभाजी पवार हे ही चांगल्या योग्यतेस चढले. छत्रपती शाहू महाराजांचे वेळीं संभाजी पवारांचे पुत्र उदाजी व आनंदराव व नातू यशवंतराव हे अत्यंत प्रमुख व प्रबल सरदार गणले जात होते. यशवंतरावांस तर " राजा " हा बहुमानाचा किताबही मिळाला होता. (Malleson) दिल्ली येथील बादशाहतीशीं व अन्य राज्यांशीं बाजीराव व बाळाजी बाजीराव यांनी चालविलेल्या राजकारणांत यशवंतराव दोन्ही पक्षांत मध्यस्थ किंवा जामीनदार समजले गेल्याची दोन तीन उदाहरणें वर आली आहेत, त्यांवरून दिल्लीचे बादशाहींत, दुसऱ्या रजपूत राज्यांत व छत्रपतीचे दरबारीं यशवंतरावांचे वजन व दर्जा किती वरीष्ठ प्रतीचा मानिला जात होता ही गोष्ट स्पष्ट होईल. शिवाय पानीपत येथील प्रसिद्ध रणसंग्रामांत युद्धाचे मुख्य नेते सदाशिवरावभाऊ यांनीं यशवंतरावांस युद्धांत जें स्थान दिलें होतें त्यावरून ते यशवंतरावांस किती मानीत होते हें ध्यानांत येईल. यशवंतरावाप्रमाणेंच त्यांचे बंधु रायाजी पवार (अमदाबादकर) यांस ही " राव " ही सन्मानाची पदवी मिळाली होती व ती ते आपल्यास लावीत असत. आम्हांस सन तिसा सितेन (ई. स. १७६८ -६९) सालाचा एक महत्वाचा कागद " झाडा महाल हिंदुस्थान " मिळाला आहे, (खांडेकर संग्रह) त्यांत यावर्षीं कोण कोणत्या सरदारांकडे उत्तर हिंदुस्थानांतील कोण कोणते महाल सरंजामासाठीं वहिवाटीस होते, या बद्दलची नोंद आहे. त्यांत होळकरांकडे सव्वाचौदा महाल दाखविले असून शिंद्यांकडे पावणे एकोणीस महाल असल्याचें म्हटलें आहे व पवारांकडेस साडे सत्तावीस महाल; पैकीं धारकर पवारांकडे सवाअठरा, देवासकरांकडे सवासात व अमदाबादकर पवारांकडे दोन असे दाखविले आहेत. या शिवाय दक्षिणेंतील पुष्कळ मोठा विश्वासराईचा सरंजामही पवारांकडे होता. यावरून त्या कालीं मराठे सरदारांत पवारांचा दर्जा कशा प्रकारचा होता व त्यांची सत्ता किती विस्तृत प्रदेशावर होती, हें चांगलें ध्यानांत येईल.

असो; धारच्या पवार राजघराण्यांतील प्रतापि पुरुषांनीं राष्ट्र कार्यासाठीं आरंभापासून अखेरपर्यंत किती परिश्रम केले, कष्ट सोशिले व अनेक मोठ मोठ्या कामगिऱ्या बजावून स्वपराक्रमानें आपला दर्जा व वैभव कसें वाढवून घेतलें, याचा हा असा त्रोटक वृत्तान्त आहे. यांत या घराण्यांतील पुरुषांचे आनुवंशिक शौर्य, उज्वल स्वामिभक्ति व अढळ राष्ट्र प्रीति इत्यादि सद्गुण व्यक्त झाले आहेत.

येथें देवास वगैरे इतर शाखांतील पुरुषांकडूनही मराठी साम्राज्या साठीं काय कामगिऱ्या बजावल्या गेल्या, हें दाखवावयाचें होतें, परंतु साधनांचे अभावामुळें व तो भाग आंखलेल्या विषय मर्यादेच्या बाहेर असल्यामुळें, तूर्त तसें करतां आलें नाहीं. आज पावेतों उपलब्ध झालेल्या साधनांवरून विशेषतः धारकर पवारांचे कामगिऱ्यांचीच ही थोडक्यांत हकीगत तयार केली आहे. हल्लीं ही जुने कागद पत्र पहा ण्याचें काम चालूच आहे व कांहीं जुन्या घराण्यांच्या पत्रव्यवहाराची तपासणी अद्याप व्हावयाची आहे; ती झाल्यावर यांत आणखी भर पडण्याची उमेद असून राहिलेल्या उणीवांची ही पूर्तता होईल अशी खातरी वाटते.

इति शम्.

परिशिष्ट.

माळव्याचा सुभेदार राजा गिरधर बहादुर याचा मृत्यु कधीं झाला?

धारकर पवारांचे कामगिरींत माळव्याचा बादशाही सुभेदार राजा गिरधर बहाद्दर याचे मृत्यूचा निर्देश प्रमुख पणें येतो, परंतु ही गोष्ट कोणत्या सालांत घडली याविषयीं मात्र वाद आहे.

मालकम साहेबांनी गिरधर बहाद्दराच्या मृत्यूचें साल दिलें नाहीं, तथापि आपले मध्यहिंदुस्थानचे रिपोर्टांत त्याचा पराभव उदाजी पवार व चिमणाजी पंडित यांनीं आगर येथें ई. स. १७२४ नंतर केल्याचें लिहिलें आहे. (Malcolms' Report Page 52) ग्रँट् डफ् साहेबांनीं आपल्या मराठ्यांचे इतिहासांत गिरधर बहाद्दर हा उदाजी पवार व चिमणाजी दामोदर यांज कडून युद्धांत मारला गेल्याचें लिहिलें असून त्याच्या मृत्यूचें साल ई. स. १७२९ दिलें आहे. (Grant Duff, 4th edition, Vol I Page 436) अयर्व्हिनचे उत्तर मोगलशाही वरील ग्रंथांत माळव्यांतील मराठ्यांचे स्वाऱ्यांविषयींचा पुष्कळसा भाग विशेषतः ग्रँट डफ् यांचे आधारानेंच लिहिला असल्यानें. (Later Mughals Page 241 foot note) अयर्व्हिन यांस ग्रँट् डफ् यांनीं दिलेलें साल मान्य होतें असें दिसतें, परंतु प्रो. जदुनाथ सरकार यांनीं अयर्व्हिनचा सदर ग्रंथ अलीकडे संपादिला आहे, त्यांत त्यांस मिळालेल्या साधक बाधक प्रमाणांवरून त्यांनीं गिरधर बहाद्दरचे मृत्यूची ता० ८ डिसेंबर १७२८ ईसवी मानिली आहे. (L. M. Page 244 foot note) रियासतकार सरदेसाई यांनीं पुरुषोत्तमकृत देवी अहल्या चरित्राचे आधारावर हें साल ई. स. १७२४ असल्याचें म्हटलें

आहे, आणि अहल्या चरित्रांत हें साल बहुधा इंदूरकर मंडलोई यांजकडील एका पत्राचे नकले वरून * घेतलें असावें असें दिसते. या नकलेचें अस्सल पत्र हल्लीं उपलब्ध नाहीं; तें मिळाल्यास या वादाचा सहज निकाल लागेल. हल्लीं या पत्राच्या नकलां वरून केलेल्या नकला मात्र अन्य ठिकाणींही आढळतात, व त्या नकलांची परस्पर तुलना केल्यास निरनिराळ्या नकलांत नकलकारांचे अनेक प्रमाद झालेले आढळून येतात. क्वचित ठिकाणीं अक्षरांत व शब्दांतही अधिक उणेपणा झाला असून तसा तो आकड्यांतही होणें संभवनीय आहे, आणि त्याबद्दल असा संशय प्रो. जदुनाथ सरकार यांणीं ही आपल्या Later Mughals Vol. II पृ. २४४ च्या टिपेंत व्यक्त केला आहे. या प्रसंगाचे सालाविषयीं इतिहासज्ञांत असा मतभेद आहे; म्हणून त्या बद्दल येथें थोडक्यांत विचार करावयाचा आहे.

राजा गिरधर बहादुर याची नेमणूक माळव्याचे सुभेदारीवर आरंभीं ता. ९ सेपटेंबर १७२२ ई. पासून झाली होती, परंतु पुढें निजामानें गिरधर बहाद्दरास माळव्याचे कामावरून दूर करून त्यावर आपला संबंधी अजीमुल्लाखान यास ता. २९ मे १७२३ रोजीं नेमिले; तेव्हां अर्थातच राजा गिरधराकडे माळव्याचा अधिकार राहिला नाहीं. तथापि पुढें दिल्ली दरबारांत निजामाचें वर्चस्व कमी होतांच गिरधर बहाद्दर यास ता. १२ जून १७२५ रोजीं पुनः माळव्याचे सुभेदारीचा अधिकार मिळाला; असें अयर्व्हिन नें Kamwarkhan Page 199 चे आधारवर म्हटलें आहे; (Irvine's Later Mughals Page 242) तेव्हां गिरधर बहाद्दर हा ई. स. १७२४

* या नकलेची नकल रा. गो. स. सरदेसाई यांणींही आपल्या मराठी रियासत मध्यविभाग १ मध्यें पृ. ३२९ वर दिली आहे.

नंतर हयात होता ही गोष्ट स्पष्ट होते.

कै. रावबहादुर पारसनीस यांच्या इतिहाससंग्रहाचे ६ वे भागांत पृ. ११८ वर " शाहूमहाराजांची कंठाजी कदम व पेशवे यांस पत्रें " या सदराखालीं " गुजराथ व माळवे येथील चौथाई सरदेशमुखीचा अंमल सन सितपासून निमे राजश्री पंतप्रधान यांचे स्वाधीन व निमे राजश्री खंडेराव दाभाडे सेनापती यांचे स्वाधीन केला आहे. × × त्यासी तुम्हांस कथला कराया गरज नाहीं " असें कंठाजी कदम यांस लिहिलेलें पत्र दिलें असून त्या संबधानें गिरधर बहाद्दर यासही साहित्य पत्र पाठविल्याचा उल्लेख केला आहे. (पृ. ११९) अर्थात् सितपासून अंमल दिला गेल्यावर कदम बांडे यांजकडून कांहीं आगळीक झाल्यामुळें त्यांस हें पत्र लिहिलें गेलें असावें हें उघड दिसतें, व त्यावरून सन सित अशरीन ह्मणजे ई. स. १७२५-२६ सालीं गिरधर बहाद्दर हा माळव्यांत कामावर होता हें स्पष्ट होतें.

नुकतेच गेल्या आक्टोबरांत प्रो. जदुनाथ सरकार, रा. गो. स. सरदेसाई व रा. वि. स. वाकसकर हे प्रसिद्ध इतिहास संशोधक व लेखक माळव्यांत संशोधनासाठीं आले होते. त्यांस मंदसोर येथें तेथील पीरजादा साहेबां जवळ दोन तीन गिरधर बहाद्दराच्या शिक्का मोर्तबाच्या अस्सल सनदा पाहावयास मिळाल्या. त्या दिल्लीचा बादशाह मुहम्मदशाह याचे राज्यरोहणा पासून सात आठ व दहा वर्षांच्या आहेत, असें रा. सरदेसाई व वाकसकर यांनीं ता. १७ नोव्हेंबर १९२९ च्या केसरीपत्रांतील आपल्या लेखांत नमूद केलें आहे; तेव्हां या सनदांचा ही येथें विचार करणें अवश्य आहे. मुहम्मदशहाचा जुलूस (राज्यारोहणाचा सन) ता. १८ फेब्रुआरी सन १७१९ ई. पासून सुरू झाला असून तिसऱ्या सनदेवर असलेलें त्याचें दहावें वर्ष ई. स. १७२७ च्या नोव्हेंबरच्या १२ व्या तारखेस सुरू होतें, तेव्हां ई. स. १७२७ तही कदाचित् गिरधर बहाद्दर हा हयात असेल असें वाटतें.

येथपर्यंत उपलब्ध झालेल्या साधनांवरून गिरधर बहादराची हयात कोठपर्यंत पुढें जाऊं शकते हें दाखविलें, आतां त्याच्या मृत्यूचें साल कोणतें अनुमित होतें, तें पाहूं.

ग्रँटडफ् यांनीं गिरधर बहादर याच्या मृत्यूचें साल ई. स. १७२९ दिलें असून त्याचे नंतर त्याचा संबंधी दयाबहादर याजकडे माळव्याच्या सुभ्याचें काम सोंपविलें गेल्याचें म्हटलें आहे; आणि राव बहादुर पारसनीस यांनीं आपल्या ब्रह्मेंद्र स्वामीचे चरित्रांत चिमणाजी आपांचें एक पत्र दिलें आहे, (पृ. ६८ ले. ४३) त्यांत माळवा प्रांतात दयाबहादर युद्धास आला, स्वामीच्या आशीर्वादानें त्यास पराभवातें पाठविलें असें चिमणाजी आपांनीं ब्रह्मेंद्र स्वामींस लिहिलें आहे. हें पत्र ता. ४ मे १७२९ चें आहें तेव्हां मे १७२९ च्या पुर्वीं दयाबहादर हा माळव्याचे कामावर असला पाहिजे. दुसरें पेशव्यांची शकावली पृ. ९७ मध्यें ई स. १७२८ च्या आक्टोबरचे किंचित् पूर्वीं माळव्याचा सुभा दयाबहादर याशीं उज्जयिनी जवळ लढाई झाल्याचें लिहिलें आहे, त्यावरून ई. स. १७२८ मध्यें ही दयाबहादर हा माळव्यांत सुभ्याचे अधिकारावर होता असें दिसतें.

या शिवाय गिरधर बहादरचे मृत्यु नंतर व दयाबहादर माळव्याच्या सुभ्याचे अधिकारावर येण्यापूर्वीं माळव्याचा कारभार कांहीं काल अन्य व्यक्तीं कडे होता, याविषयींचा उल्लेख प्रो. जदुनाथ सरकार यांनी संपादिलेल्या, Later Mughals Vol. II या ग्रंथांत पृ. २४७ मध्यें आला आहे. तेव्हां गिरधर बहादर याचा मृत्यु ई. स. १७२८ च्याही पूर्वीं झाला असला पाहिजे, हें सहज अनुमान होतें. प्रो. सरकार यांनीं आपल्या या ग्रंथांत गिरधर बहादर चे मृत्यू नंतर त्याचा मुलगा भवानीराम यास बादशहानें, त्याचे बापाचे मृत्यू बद्दल शांतवनपर पत्र लिहून त्यास माळव्याच्या सुभ्याचे कामावर नेमिल्याचें साधार दाखविलें आहे; व भवानीरामाचे कारकिर्दींत कित्येक महिने त्यास

दिल्लीहून मदत न आल्यामुळें माळव्यांत फारच गडबड राहिली, व त्याचे हातांखालील सरदार सय्यद निजामउद्दीन अली खान यानेंच स्वतः सुभ्याचा अधिकार बळकावण्याचा प्रयत्न केला, तेव्हां बादशहानें माळव्याच्या सुभ्याचें काम राजे सवाई जयसिंग याजकडे सोपविलें, असें लिहिलें आहे. (Later Mughals Vol. II Page 247)

राजा भवानीरामानंतर जयसिंगानें माळव्याचा कारभार किती काल पाहिला हे अद्याप नीटसें कळलें नाहीं तथापि यावेळीं मांडवगडावर मराठ्यांनीं आपलें ठाणें बसविलें होतें तें राजे जयसिंग व मुहम्मद उमरखां (मांडूचा फौजदार) यांनीं येऊन ई. स. १७२७-२८ त उठवून लाविल्या बद्दलचा एक दाखला धरमपुरी येथील जमीदार यांजकडील एका महजरांत उपलब्ध झाला आहे; त्यावरून यावेळीं कांहीं महिने तरी जयसिंगाकडे माळव्याचा अधिकार राहिला असावा असें स्पष्ट दिसतें. अशारीतीनें भवानीराम व जयसिंग या उभयतांच्या कारकिर्दीचे कालाचा विचार केला असतां तो वर दर्शविलेल्या त्या वेळच्या परिस्थिती प्रमाणें निदान वर्ष सवा वर्षांहून तरी कमी नसला पाहिजे असें वाटतें; व त्या वरून वर दर्शविल्या प्रमाणें ई. स. १७२८ आक्टोबरच्या निदान वर्ष सवावर्ष पूर्वीं म्हणजे ई. स. १७२६-२७ मध्यें गिरधर बहाद्दर लढाईत मारला गेला असावा हें अनुमान दृढ होतें.

येथें मंदसोर येथें मिळालेल्या ई. स. १७२७ मधील गिरधर बहाद्दर याच्या शिक्का मोर्तबाच्या सनदेची वाट काय असा प्रश्न उपस्थित होईल. त्याचें उत्तर हें कीं, गडबडीच्या काळांत नवे शिक्के तयार होई पर्यंत बापाचे शिक्के मुलाचे कारकीर्दींत वापरले गेल्याची उदाहरणें इतिहासांत पुष्कळच आढळतात; तेव्हां गिरधर बहाद्दराचे मृत्यु नतर त्याचा मुलगा भवानीराम याचे गडबडीचे कारकिर्दींत गिरधर बहाद्दराचाच शिक्का वापरला गेला असावा.

बाजीराव पेशव्यांनीं जयपुरकर राजे सवाई जयसिंग यांस गिरधर बहाद्दर याचे मृत्यूची खबर कळविली होती, तिचा उल्लेख राजे जयसिंग यांचे एके पत्रांत आला आहे. परंतु त्या पत्रांत राजा गिरधराचे मृत्यूचा जो शक दिला आहे तो संशयित आहे. तो शक १६४६ आहे कीं, १६४८ आहे ? या बद्दल संशय आहे. रा. सरदेसाई यांनीं ही आपल्या मराठी रियासत मध्यविभाग १ च्या पहिल्या आवृत्तींत पृ. ३६२ मध्यें टिपंत हा संशय प्रदर्शित केला होता; तेव्हां गिरधर बहाद्दरचे मृत्यूचे कालनिर्णयाचे कामीं या संशयाचा ही फायदा घेणें अनुचित होणार नाहीं. त्या पत्रांतील शक १६४६ वरून ई. स. १७२४ व १६४८ वरून ई. स. १७२६ ही सालें राजा गिरधर बहाद्दर याचे मृत्यूची येतील, परंतु ई. स. १७२५ नंतर त्याचे हयातीबद्दल वर प्रमाणें दिली आहेत; तेव्हां जयसिंगाचे या पत्रा वरून ही शके १६४८ त ह्मणजे ई. स. १७२६-२७ त गिरधर बहाद्दर याचा मृत्यु झाला असावा हेंच अनुमान कायम होतें.

याहून अधिक स्पष्ट आधार उपलब्ध होऊन या प्रश्नाचा कायमचा उलगडा होई पर्यंत वर दिलेल्या उपलब्ध पुराव्यांवरून तूर्त आह्मीं ई. स. १७२६ हेंच गिरधर बहाद्दर याच्या मृत्यूचें साल पृ. ११ मध्यें दिलें आहे. अधिक सबळ आधार कोणी दाखविल्यास पुढें त्या प्रमाणें आवश्यक फेरफार करतां येईल.

धारच्या पवारांची कामगिरी
व्यक्ति, स्थल व प्रसंग यांची सूची.

तील स्वारी, गुजराथ व माळव्याचा मोकासा सरंजामी मिळविला, माळव्यांतील बादशाही सुभ्याचा मोड इ. स. १७२३, पवारांनीं अंमल साधेल तो साधावा असें ठरलें, गुजराथ व माळव्यांतील स्वाऱ्या. गुजराथेंत लुनावाड्यापर्यंत वचक बसविला, १०. गुजराथेंत हमीदखानास मदत व रुस्तमअलीचा पराभव वसो येथें, सारंगपूरची लढाई, गिरधर बहादराचा मृत्यु, गिरधरचे संबंधी राव गुलाबराम व आनंदराम पडले, छ. शाहू महाराजांनीं माळवा व गुजराथचा तहनामा करून दिला, पिलाजी गायकवाडाशी झटापटी, डभई व बडोदा हे किल्ले पिलाजीचे स्वाधीन केले व पुढें माळव्यांत स्वारीवर आले, ११. मनसुब्याकरीतां छत्रपतींचें बोलावणें, चिमणाजीआपा बरोबर गुजराथचे स्वारीवर, सरबुलंदखान याशीं हक्क वसूली संबंधानें बोलणें, वहिवाटी प्रमाणें खंडणीची वसूली, चापानेर किल्ला काबीज व आपाबरोबर माळव्यांत परत, पालखेडची लाढई व मुंगीशेवगांवाचा तह, माळव्याचा सुभा भवानीराम याशीं चकमकी, १२. माळव्यांतील स्वारींत मल्हारराव होळकर बरोबर होते इ. स. १७२८ त, उदाजीरावांच्या सनदा दीडशेंहून अधिक, माळव्याचे स्वारींत दयाबहादराचा पराभव, १३. पुनः उज्जयिनी जवळ दयाबहाद्दराचा पराभव बुंदेलखंडची स्वारी, महंमदखान बंगष व कायमखान याशीं लढाई व पराभव, छत्रपतीचे दरबारी मनसुब्याकरितां, उदाजीरावांनीं नारोशंकर यांस माळव्यांत पाठविलं, इंदुरकर मंडलोई यांशीं पत्रव्यवहार, मांडवगड पुनः काबीज, १४. सवाई जयसिंहास मांडवगड परत दिला, पावागडची स्वारी, दाभाड्याचे पक्षास सामील, डभोईची लढाई, बाजीराबाशी तेढ, पुढें सफाई व सरदारीची वस्त्रें, तिरळ्याची लढाई, तींत बंधु जगदेवरावही, होते. १५. पुढें खानदेशांत व तेथून माळवा बुंदेलखंडांत, दुर्जन सिंहाचे साहित्य करण्याविषयीं शाहू महाराजांची आज्ञा, कोंकणांत हबशावरील मोहीम, सिद्दी-अंबर अफवानी याचा पराभव व शिरच्छेद वाडीपाचाडयेथें, आणखी कांहीं सनदा मिळविल्या, मध्यप्रांतांत फते-पुरास व पुढें गुजराथेंत, १६. इ. स. १७३५ चे आरंभीं माळव्यांत, पुढेंहीं कांहीं सनदा मिळाल्या, छत्रपतीची नाराजी, गैरमर्जीचें शल्य व ब्रम्हेंद्र स्वामींची शिफारस, छत्रपतीची बहाल मर्जी होऊन काम काज घेण्यांत येऊं लागले, गोवळकोटचे मोर्चासाठी स्वार

मोहिमावर निघाले, पुणियास येऊं तेव्हां हिशेब पाहूं, दिल्लीची स्वारी, झीलचे तलावा जवळील लढाई, २६ भोपालची लढाई, वसईची मोहीम, नादिरशहावरील स्वारीची तयारी, २७. बुंदेलखंडांत छत्रसालाचे पुत्रांशीं करार झाला त्यांत मध्यस्थ, इ. स. १७३९ त पुनः स्वारीवर, बाजीराव पेशव्यांचा धारेजवळ मुक्काम, यशवंतरावानें धार व सोनगड हीं स्थळें पेशव्यांस दिली, निजामाची गडबड, २८ अजीमुल्लाखान माळव्याचा सुभेदार, होळकर, पवार वगैरेंनीं पुनः धार फत्ते केली, माळव्याच्या सनदेचें कारस्थान, पुष्करावर जयसिंग व धोकलसिंग यांचा सल्ला घडवून आणला, २९ पुढें हिंदुस्तानचे स्वारीवर, गढामंडळ येथील ठाणीं काबीज, दमाजीची माळव्यावरील स्वारी, ३०. यशवंतरावाची धारेस पुनःकायमी, बुंदेलखड बंगाल पावेतोंची स्वारी, माळव्याची सनद, सनदेंतील शर्तीबदल जामीन राहिले, ३१. यशवंतरावाचें महत्व व योग्यता, बुंदेलखंडांतील स्वारी, प्रकृती नादुरुस्त यामुळें धारेस, सदाशिवराव भाऊची बहादुर भेंड्यावर स्वारी, भाऊंशीं यशवंतरावांचा बेबनाव, महाल व किल्ले जप्त, यावेळची यशवंतरावांची स्थिती, बासवाडा वगैरे मुलखांत लूट, निजामाकडे संधानाचा विचार, ‘ पंचहजारी साहेब नौबत ’ किताब निजामाकडून, ३३ मराठी राज्याशीं अविरोधी वर्तन, मुत्सद्यांचे साहाय्यानें समेट, महाल व किल्ले यांचे जप्तीची मोकळीक, १७५१ तल्या स्वारींत पवारांचें पथक, दक्षिणेंत खुदावंद खानावर १०००० स्वारा निशीं, घोडनदीचें युद्ध, कुकडीची लढाई वगैरे, ३४ शिंगवा व भालकी येथील तह, कर्नाटकची स्वारी, मे १७५३ इ. त. मलप्रभा नदीवर मुक्काम, हिंदुस्थानचे स्वारीवर, कुंभेरीचे वेढ्यांत मदत, यशवंतराव व त्यांचे बंधु रायाजी यांची सरदारी एकत्र होती, उभयतांमधील वांटणी, ३५ इ. स. १७५५ त हिंदुस्थानचे स्वारी वर, नागोरचा वेढा, श्रीरंग पट्टणचे स्वारीवर, सिंदखेडची लढाई, यशवंतरावानें निजामाम खिडींत अडवून मुलखाच्या सोडचिठ्ठ्या मिळविल्या, थर्मापिलीचे खिंडींतील प्रकाराचें स्मरण, निजामाशीं चाललेलीं प्रकरणें, उदगीरची लढाई, कवळ्याचें रानांत मोंगलाचे चंडोलाचा मोड, घोडनदीचे कांठीं

F
62